दैनिक अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

www.rashtrasahyadri.com

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ७ वे ● अंक २३ ● शनिवार, ०१ नोव्हेंबर २०२५ ● पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००

## खा. संजय राऊत यांची प्रकृती बिघाडली; ऐन निवडणुकीत सार्वजनिक जीवनातून दूर



राज्यातील महाविकास आघाडीचे शिल्पकार आणि उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदी बसवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे खासदार संजय राऊत यांना गंभीर आजार झाल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे संजय राऊत यांनी पुढील दोन महिने सार्वजनिक जीवनापासून पूर्णपणे दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे. ते आता थेट नवीन वर्षात सार्वजनिक जीवनात पुनरागमन करतील. मात्र, मुंबई महानगरपालिका निवडणुकीला अवघे काही महिने शिल्लक राहिले असताना शिवसेनेची धडाडती तोफ म्हणून ओळखले जाणारे संजय राऊत यांनी राजकारणापासून ब्रेक घेणे हा ठाकरे गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

### झापुक । zupuk

अर्चा
केल्याने पाप
धुतलं जात

काहीही करा
वाईट कर्मांच
फळ शेवटी
भोगावच लागतं

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

### महत्वाचे...

## आमदारांच्या पाहणी दौऱ्यात तलाठी टल्ली; निलंबनाच्या सूचना

**कोल्हापूर** : शासकीय कार्यालयात अनेकदा अधिकारी, कर्मचारी किंवा शाळेत शिक्षक महाशय मद्यधुंद अवस्थेत असल्याचे दिसून आले आहे. कोल्हापूर जिल्ह्यात आमदारांच्या पाहणी दौऱ्यातच चक्क तलाठी महोदय दारुच्या नशेत आढळून आल्याने पुन्हा एकदा प्रशासनाची इभ्रत वेशीवर टांगली गेली आहे. यावेळी, इचलकरंजी येथील तलाठी यांना आमदारांनी खडे बोल सुनावत त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. इचलकरंजी येथील जुना सांगली नाका परिसरातील रस्त्याचे रुंदीकरण व सुशोभिकरण कामाची पाहणी करण्यासाठी आलेल्या आमदार राहुल आवाडे यांच्यासमोर सहाय्यक तलाठी मद्यधुंद अवस्थेत निदर्शनास आले. आमदार आवाडे यांनी त्याची गांभिर्याने दखल घेत सहाय्यक तलाठ्याचे वैद्यकिय तपासणी करुन तात्काळ निलंबित करण्याच्या सूचना वरिष्ठांना केल्या आहेत. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर प्रशासनात चांगलीच खळबळ उडाली.

## शस्त्र तस्करी : महाराष्ट्र केसरी सिकंदर शेखला अटक



**कोल्हापूर** : महाराष्ट्र केसरी सिकंदर शेखला पंजाब पोलिसांनी अटक केली आहे. अवैध शस्त्र तस्करी प्रकरणात सिकंदरचा सहभाग असल्याचा आरोप प्राथमिक दर्शनी तपासातून समोर आला आहे.

राजस्थानमधील पपला गुर्जर टोळीशी त्याचा संबंध असल्याचे पोलिस तपासातून समोर आल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. दरम्यान, याप्रकरणी सिकंदरच्या कुटुंबीयांना बोलण्यास नकार दिला असून खोट्या गुन्ह्यात आमच्या मुलाला अडकवलं जात असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

# ३० जूनपर्यंत कर्जमाफी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या आश्वासनंतर बच्चू कडूंची माघार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : ३० जूनपर्यंत कर्जमाफी करण्यासंदर्भात अंतिम निर्णय घेणार असल्याचे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. प्रहारचे प्रमुख बच्चू कडू यांच्या आंदोलनानंतर सरकारने हा निर्णय घेतला आहे. आम्ही जी उच्चस्तरीय कमिटी स्थापन केली आहे, ती समिती १ पर्यंत एप्रिल आम्हाला अहवाल देईल. त्यानंतर ३० जूनपर्यंत कर्जमाफीबाबत अंतिम निर्णय घेणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चे नंतर बच्चू कडू यांनी समाधान व्यक्त करीत आंदोलन स्थगित करण्यात येत असल्याची घोषणा केली. (पान ४ वर)

### ■ दिलेला शब्द पाळणार

आम्ही कर्जमाफीबाबत सकारात्मक आहोत. दिलेला शब्द आम्ही पाळणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. आताजर आपण शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे दिले नाहीत तर शेतकरी रब्बीची पेरणी करु शकणार नाही. त्यासाठी आता शेतकऱ्यांना पैसे देणे महत्वाचे आहे. पैसे देण्यास सुरुवात झाली आहे. साडेआठ हजार कोटी रिलीज झाले आहेत असे मुख्यमंत्री म्हणाले. पुढच्या १५ ते २० दिवसात राज्यातील ९० टक्के शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पोहोचणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.

### ■ न झुलवता तात्काळ कर्जमुक्त करा : उद्धव ठाकरे

राज्य सरकारकडून जूनपर्यंत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली असली तरी जूनपर्यंत होणाऱ्या आत्महत्यांची जबाबदारी सरकार घेणार काय, असा करडा सवाल शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सरकारला केला आहे.सरकारने पुढच्या जूनचा गूळ शेतकऱ्यांच्या कोपराला लावला आहे. आत्ता हालअपेष्टा तशाच राहणार, असेच बहुदा सरकारला सांगायचे असावे. शेतकऱ्यांना फसवण्याचे हे खेळ बंद करा आणि अभूतपूर्व संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना न झुलवता तात्काळ कर्जमुक्त करा, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे सरकारला केली आहे.

## सारखं माफ, सारखं फुकट...

### कर्जमाफीबाबत अजितदादांचे वक्तव्य

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई** : शून्य टक्के व्याजदराने पैसे दिल्यानंतर तुम्ही कर्ज फेडा ना? की सारखं माफ, सारखं फुकट, सारखं माफ, साहेबांनी एकदा कर्जमाफी दिली, असं वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं होतं. त्यांच्या या वक्तव्यावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. दादांचे भाषण ऐकले सारखं सारखं कर्जमाफी होणार नाही असं ते म्हणाले. दादा आम्ही सारखं कर्जमाफी मागत नाही. परिस्थिती निर्माण होते त्याला आम्ही तरी काय करणार? असा सवाल शेट्टींनी उपस्थित केला.

हमीभावापेक्षा शेतकरी कमी किंमतीने शेतमाल विकतोय. त्यामुळं शेतकरी कर्जबाजारी होतोय. त्यामुळं सरकारकडे मदत मागावी लागते. शेती मालाला भाव मिळत नाही याचा सरकारशी धोरणाशी संबंध असल्याचे शेट्टी म्हणाले. गेल्यावर्षी साखर निर्यातमध्ये बंदी घातली नसती तर आम्हाला पाच हजर रुपये दर मिळाला असता असे राजू शेट्टी म्हणाले. सरकारची धोरणे चुकीची असल्याने त्याचे परिणाम आमच्यावर होतात. म्हणून मदत मागतो, तुमची ती जबाबदारी आहे असे शेट्टी म्हणाले. (पान ४ वर)

### ...म्हणून शेतकऱ्यांना तुकड्या तुकड्यात एफआरपी

नुकसान भरपाईच्या कोणत्याही निकषांवर ऊस उत्पादक शेतकरी बसत नाही. कारखान्यावर कर्जाचा बोजा पडतो म्हणून शेतकऱ्यांना तुकड्या तुकड्यात एफआरपी दिली जाते. हे बरोबर नाही. आम्ही एफआरपी च्या बाजूला एकरकमी द्या, अशी मागणी केली आहे. त्याच्या विरोधात राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात गेले. शेतकऱ्यांच्या विरोधात सरकार सर्वोच्च न्यायालयातील हे काय बरोबर नाही, असे राजू शेट्टी म्हणाले.

## राज ठाकरेंकडून भावनिक मुद्दे काढण्याचा प्रयत्न : शिवेंद्रराजे भोसले



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : विरोधकांकडं मुद्दे राहिले नसल्याने त्यांचे कडून भावनिक मुद्दे काढण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू असल्याची टीका मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसलेंनी केली आहे. त्यांनी काल शिर्डी येथे येत साई समाधी चे दर्शना नंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

नमो सेंटरवरूनही त्यांनी नाव न घेता मनसे अध्यक्षांवर निशाणा साधला.मुंबईत निवडणूक आयोगाविरोधात मोर्चे काढण्यात येणार आहेत. विरोधक हतबल झाले आहेत. विरोधकांना येणाऱ्या निवडणुकीत यश मिळणार नाही. महाविकास आघाडीनं कितीही जुळवाजुळव करण्याचा प्रयत्न केला तरी महाराष्ट्रातील जनतेचा त्यांच्यावर विश्वास ठेवणार नाही. लोकसभेत महाविकास आघाडीला यश मिळाले. पण विधानसभेत अपयश आलं. यातून अजून हे सावरले नाहीत, अशी टीका मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी महाविकास आघाडीवर केली आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नमो सेंटर उभं केलं की फोडून टाकणार या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना शिवेंद्रसिंहराजे म्हणाले की, छत्रपतींचा विषय काढल्याशिवाय काही लोकांना निवडणुकीत मुद्देच मिळत नाहीत. त्यामुळे आता गडकिल्ल्यावर उभे केलेल्या नमो सेंटरवर बोलत आहेत. नमो सेंटरची माहिती तर घ्यायला पाहिजे. नमो सेंटर काय आहे त्यामुळं काय होणार आहे गडकिल्ल्यांवर येणाऱ्या शिवभक्तांना यामुळे काय सुविधा मिळणार याची माहिती घेऊन विरोध करावा. निवडणुका येऊ घातल्यानं विरोधाला विरोध काही नेतेमंडळींनी करू नये, अशी टीका मंत्री भोसले यांनी केली आहे .

पुढे ते म्हणाले की,राज्यातील काही भागातील पूरस्थिती पाहता विरोधकांना वाटले होते की, सरकारकडून अपुरी मदत मिळेल. मात्र, तसं झालं नाही. सरकारनं पुरग्रस्त शेतकऱ्यांना उदारहस्ते मदत केली. मोर्चा आणि आंदोलन करण्याचा अधिकार कोणीही हिरावून घेऊ शकत नाही.

पुराव्यांवर बोललं पाहिजे, तथ्यांवर बोललं पाहिजे. नुसते मोकळे आरोप करण्याचे आता काही कारण नाही. मतदार याद्यांचं काम चालू आहे. (पान ४ वर)

## शिर्डी विमानतळावर स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकरीची मागणी पूर्ण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव** : कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील मौजे काकडी येथील शिर्डी विमानतळ प्रकल्पासाठी स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकरी मिळावी, अशी मागणी करण्यासाठी युवकांनी आणि ग्रामस्थांनी विमानतळाच्या गेटसमोर उपोषण सुरू केले होते.

या आंदोलनाकडे लक्ष वेधण्यासाठी मा. आमदार स्नेहलताताई कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेते विवेक कोल्हे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयात प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन दिले. निवेदनावर सकारात्मक प्रतिसाद देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी विमानतळ प्रशासनाशी चर्चा करून तातडीने उपाययोजना केली. यानंतर विमानतळासाठी ठेकेदारी पद्धतीने काढलेले टेंडर रद्द करण्यात आले आणि स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकरी (पान ४ वर)

## पंचायत समिती आवारात लांडग्याचा ५ जणांवर जीवघेणा हल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लातूर** : मानवी वस्तीत वन्य प्राण्याचा वावर ही बाब चिंताजनक बनली असून गेल्या काही दिवसांत बिबट्या हल्ल्यात दोघांचा जीव गेल्याची घटनादेखील समोर आली आहे. त्यामुळे, वन विभागाकडून योग्य ती खबरदारी घेऊन नागरिकांना मोकळा श्वास देण्याची जबाबदारी वाढली आहे. त्यातच, लातूर जिल्ह्यात देवणी शहरातील पंचायत समिती परिसरात आज दुपारी सुमारास तीन वाजताच्या सुमारास एका पिसाळलेल्या लांडग्याने अक्षरशः धुमाकूळ घातला. या लांडग्याच्या हल्ल्यात पाच ते सहा जण गंभीर जखमी झाले असून, यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना तातडीने उदगीर येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. पंचायत समिती आवारात एका पिसाळेला लांडगा अचानक आल्याने परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं होतं. त्यातच, या हल्ल्याने येथील नागरिकांवर झडप घातल्याने सगळंच घाबरले. लांडग्याने ५ ते ६ जणांवर वेगाने हल्ला चढवला. यापैकी दोघे गंभीर आहेत.

## ऊस दराबाबत योग्य वेळी निर्णय घेवू : आ. काळे

### कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचा गाळप हंगाम सुरु




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कोणता कारखाना किती ऊस दर देईल त्यांच्याशी आमची स्पर्धा नाही. आपण ऊस दराचा निर्णय घेतल्यावर काही कारखाने ऊस दराचा निर्णय घेतात परंतु आपल्याला त्याच्याशी काही देणं घेणं नाही. कर्मवीर शंकररावजी काळे साहेब व माजी आमदार अशोकराव काळे यांनी नेहमीच शेतकऱ्यांचे हित जपले आहे. तो वसा आणि वारसा पुढे चालवत असतांना आजपर्यंत कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याने नेहमीच जिल्ह्यात चांगला दर देण्याची परंपरा जपली आहे आणि याहीवर्षी ऊस दराच्या बाबतीत योग्य वेळी योग्य निर्णय घेतला जाईल अशी ग्वाही आ.आशुतोष काळे यांनी दिली आहे. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ या वर्षाच्या ७१ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ कारखान्याचे ज्येष्ठ संचालक व मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे यांच्या हस्ते विधिवत पूजन करून चेअरमन आ.आशुतोष काळे यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाच्या हस्ते गव्हाणीत ऊसाची मोळी टाकून करण्यात आला याप्रसंगी आ.आशुतोष काळे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, राज्य शासनाने १ नोव्हेंबर पासून गळीत हंगाम सुरु करण्यास परवानगी (पान ४ वर)

- **कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याने कार्यक्षेत्र व कार्यक्षेत्राबाहेरील ऊस असा भेदभाव कधीच केलेला नाही. मागील वर्षी गाळपास आलेल्या कार्यक्षेत्रावाहेरील ऊसाला देखील कार्यक्षेत्राप्रमाणेच ३१००/- रुपये दर दिल्याबद्दल श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील शेतकऱ्यांनी आ.आशुतोष काळे यांचा सत्कार केला यावरून याहीवर्षी कारखान्याला कार्यक्षेत्राबाहेरून मोठ्या प्रमाणात ऊस मिळणार आहे.**
- **पुढचा काळ निवडणुकीचा असून तयारीला लागा आपण विजय मिळवणारच आहे. विरोधकांनी चाळीस वर्ष सत्ता भोगूनही त्यांच्याकडे दाखवायला काहीच नाही. मंजूर बंधारा बांधला, हिंगणी बंधारा बांधला याचं कौतुक करतात परंतु आज त्या बंधाऱ्यांची काय परिस्थिती आहे. मंजूर बंधारा दुसऱ्यांदा फुटला त्यावेळी तो बंधारा आपल्या कारखान्याकडे देखभालीसाठी हस्तांतरित करावा यासाठी कारखान्यामार्फत दोनदा पत्रव्यवहार केला मात्र राजकीय कमीपणा येईल या भीतीपोटी त्यांनी प्रतिसाद दिला नाही. शेवटी जे व्हायचे तेच झाले हा बंधारा एवढा वाहून गेला की, त्यासाठी मला निधी मिळविण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागले. काम मोठे असल्यामुळे याहीवर्षी त्या बंधाऱ्यात पाणी अडविता आले नाही याचे मला दु;ख आहे मात्र पुढील वर्षी अडविता येईल. त्यामुळे उगाचचं खोट बोलायचं आणि नागरीकांना नादी लावायचं काम विरोधकांकडून सुरु असल्याचा टोला आ.आशुतोष काळे यांनी कोल्हे यांचे नाव न घेता लगावला.**

## ‘एमपीएससी’ परीक्षेच्या तोंडावर वडिलांचे निधन, स्वत: आयसीयूमध्ये दाखल...

# तरीही राज्यातून आली पहिली, आठ वेळा मुलाखत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अकोला** : राज्यसेवेची पूर्व परीक्षा असताना, वडिलांचे अचानक निधन झाले. वडिलांच्या मृत्यूने प्रगतीच्या मनावर परिणाम झाला. ती नैराश्यात गेली. त्यात प्रकृती अस्वस्थ्यतेने तिला ग्रासलेले अशा परिस्थितीतून बाहेर पडत आपल्या लक्ष्यावर केंद्रीत करून प्रगती जगताप यांनी राज्यसेवा परीक्षेत अनुसूचित जातीमधून राज्यात प्रथम येण्याचा मान पटकावला.

राज्यसेवा मुख्य परीक्षा २७ ते २९ मेदरम्यान घेण्यात आली होती. त्यानंतर मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या १५१६ उमेदवारांची वैयक्तिक मुलाखत घेण्यात आली. या मुलाखती ३० ऑक्टोबरपर्यंत घेण्यात आल्या. या मुलाखती संपल्यानंतर रात्री






अंतिम निकाल जाहीर झाला.

सुनील जगताप असे प्रगतीच्या वडीलांचे नाव. अकोला महापालिकेत वंचित बहुजन आघाडीमधून नगरसेवक म्हणून ते निवडून आले होते. मात्र, ऑगस्ट २०२४ मध्ये त्यांचे अकाली निधन झाले. त्यामुळे प्रगती नैराश्यात गेली. डिसेंबरमध्ये पूर्व परीक्षा असताना, त्याचा अभ्यासात तिचे मन लागत नव्हते. मात्र, मित्र-मैत्रिणी आणि घरच्यांच्या मदतीने त्यातून बाहेर पडून प्रगतीने केवळ अभ्यासावर लक्ष केंद्रीत केले. सुरुवातीपासून प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी तिने तयारी सुरू केली.

### ते दिवस खूपच कठीण : प्रगती जगताप

आजारपण आणि वडीलांचे निधन हा कालावधी बराच कठीण होता. त्यामुळे नैराशेत गेले. मात्र, मित्र आणि परिवारांनी साथ दिली. त्यातून बाहेर पडले. आज यश मिळाले आहे. मात्र, ते बघण्यासाठी बाबा हयात नाहीत. त्यामुळे हे यश मित्र आणि कुटुंबियांना समर्पित करते अशी प्रतिक्रिया प्रगती जगताप यांनी दिली. राज्यसेवा परीक्षेत मिळालेले यश आनंददायी आहे. मात्र, सुरुवातीपासून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी अभ्यास करीत आहे. त्यामुळे राज्यसेवा परीक्षेत यश मिळाले असले तरी युपीएससीची तयारी सुरुच राहणार असल्याचेही ती म्हणाली.

घरी मोठा भाऊ एका आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थेत काम करतो. मात्र, आपल्या केंद्रीय लोकसेवा आयोगातून प्रशासकीय सेवा करण्याची इच्छा मनोमन ठेवत २०१८ ते २०२२ या दरम्यान ती कृषीसेवक म्हणून कार्यरत होती. ते पद सोडून तिने राज्यसेवेची तयारी सुरू केली. त्यातून तिची २०२३ मध्ये उपविभागीय अधिकारी म्हणून निवड झाली होती. मात्र, ती कळमेश्वर येथे सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून रूजू झाल्या. याच दरम्यान त्यांच्या प्रकृतीत झालेला बिघाड, त्यातून आयसीयूत तिच्यावर काही महिने उपचारही सुरू होते. मात्र, आपल्या ध्येयाने पछाडलेल्या प्रगतीने अखेर राज्यसेवेत कमाल केली. आता तिला मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा महापालिकेत सहाय्यक आयुक्त या पदावर नियुक्ती मिळणार आहे.

## संपादकीय..

# महाशक्तींचा व्यापार युद्धातील तह

अमेरिका आणि चीन या दोन आर्थिक महाशक्तींमुळे जगाला अनिश्चिततेच्या गर्तेत ढकलणाऱ्या आयातशुल्क युद्धाची 'तात्पुरत्या' व्यापारसंघर्ष विरामात परिणती झाली आहे. रोमारोमात व्यापारीवृत्ती भिनलेल्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बेलगाम भाषा आणि कृतीने आयातशुल्काचे तांडव माजवले.

दक्षिण कोरियाच्या बुसानमधील शिखर बैठकीत चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी 'बुल इन द चायना शॉप' उक्तीप्रमाणे बेकाबू झालेल्या ट्रम्प यांना वेसण घालताना वरकरणी ठोस कृतीची जोड देत सावध, मितभाषी मुत्सद्देगिरीचा मार्ग पत्करला. अमेरिका आणि चीन यांच्यात एक व्यावहारिक साम्य आहे. ते म्हणजे एखादी गोष्ट देशहिताच्या मुळावर येत असेल, तर आर्थिक दबावाचे शस्त्र वापरून कठोर भाषा आणि कृतीचा अवलंब करणे. अमेरिकेला पुन्हा महान बनविण्याच्या उद्देशाने पछाडलेल्या ट्रम्प यांनी चीनसह अवघ्या जगावर आर्थिक दबावाचे शस्त्र वापरून पाहिले. दबावाखाली अनेक देशांनी अमेरिकेच्या नव्या व्यापार अटीशर्ती मान्य केल्या.

पण चीनच्या वर्चस्वाला जंगजंग पछाडूनही ट्रम्प धक्का देऊ शकले नाहीत. ट्रम्प यांनी चीनवर १४५ टक्के आयातशुल्क लादले, तर चीननेही अमेरिकेला १२५ टक्क्यांचे जशास तसे उत्तर दिले. ५० ट्रिलियन डॉलरच्या या दोन महाशक्तींच्या युद्धात अन्य देश मात्र चांगलेच भरडले गेले. त्यामुळे अनिश्चितता निर्माण झाली. त्याला ट्रम्प-जिनपिंग चर्चेने वर्षभरासाठी विराम मिळाला आहे.

जिनपिंग यांच्याशी शेवटची भेट सहा वर्षांपूर्वी जपानच्या ओसाकामध्ये 'जी-२०' शिखर परिषदेत झाली होती. तेव्हा ट्रम्पही आजच्यासारखे उतावळे नव्हते. पण त्यांना बुसानमध्ये भेटणारे शी जिनपिंगही आता बदलले आहेत. चीनशी स्पर्धा असली तरी सध्याच्या आर्थिक धुमश्चक्रीत वर्चस्व गमावणे अमेरिकेला परवडणारे नाही, याची 'व्यापारी' ट्रम्प यांना जाणीव आहे.

दुसरीकडे अर्थव्यवस्था मजबूत राखण्यासाठी चीनला जगभरातील व्यापाराच्या साखळीशी संबंध खंडित होऊ द्यायचे नाहीत. या बैठकीपूर्वी उभय राष्ट्रप्रमुख पत्रव्यहार आणि दूरध्वनीच्या माध्यमातून एकमेकांशी संपर्कात होते.

ट्रम्प यांची कॅमेऱ्यासमोरची उतावळी देहबोली आणि विधानांवर अजिबात प्रतिक्रिया व्यक्त न करता जिनपिंग यांनी वाटाघाटीच्या टेबलावर निर्विकार चेहऱ्याने संयत मुत्सद्देगिरीच्या भाषेने ट्रम्प यांना नरम केले आणि जगभरात, विशेषतः गाझा तसेच कंबोडिया, थायलंडमध्ये युद्ध मिटविण्याच्या प्रयत्नांची प्रशंसा करीत त्यांना अप्रत्यक्षपणे 'शांतिदूत' ठरविले.

चीन आणि अमेरिकेतील परस्परभिन्न परिस्थितीमुळे आपण एकमेकांशी नेहमीच डोळ्याला डोळा भिडवून बघू शकत नाही. जगातील दोन आघाडीच्या अर्थव्यवस्थांमध्ये अधूनमधून संघर्षाच्या ठिणग्या उडणे ही बाब तशी सामान्यच आहे.

ट्रम्प यांच्या 'मागा' व्हिजनसाठी विकास पूरक ठरण्याचीच चीनची भूमिका असून उभय देशांनी तणावपूर्ण संबंधांतून योग्य दिशेने वाटचाल करीत परस्पर सहकार्यातून भरभराट साधली पाहिजे, असा ट्रम्प यांना सबुरीचा द्यायला जिन पिंग विसरले नाहीत.

व्यापाराला सर्वाधिक प्राधान्य देण्यासाठी आपले परराष्ट्रधोरण लवचिक ठेवत अध्यक्ष जिनपिंग यांनी ट्रम्प यांच्या अहंकारावर फुंकर घालत वर्षभरासाठी का होईना, हा संघर्षविराम घडवून आणला. ट्रम्प यांनीही तैवान आणि साऊथ चायना समुद्राचे वादग्रस्त भूराजकीय मुद्यांना थंडबस्त्यात टाकून जास्तीत जास्त मुद्यांवर सहमती साधण्याचा प्रयत्न केला.

परिणामी आता अमेरिकेला आता कृत्रिम बुद्धिमत्ता, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि शस्त्रास्त्रांच्या निर्मितीसाठी चीनकडून नितांत आवश्यक असलेल्या दुर्मीळ खनिजांचा पुरवठा पूर्ववत होईल. दुसरीकडे चीनलाही अत्यावश्यक असलेल्या सेमीकंडक्टर चिप्सचा अमेरिकेकडून पुरवठा केला जाईल. चीनने अमेरिकेचे सोयाबीन खरेदी करण्याचे ट्रम्प यांना नव्याने आश्वासन दिले आहे.

तर ट्रम्प यांनी चीनवरील आयातशुल्क ५७ टक्क्यांवरुन ४७ टक्क्यांवर आणण्याचा निर्णय घेतला आहे. 'फेंटानिल' या घातक अंमली पदार्थासाठी लागणाऱ्या रसायनांवरील नियंत्रण वाढवण्याविषयीही उभय देशांत सहमती झाली आहे. रशिया-युक्रेन युद्ध थांबविण्यात आपले प्रयत्न पुरेसे नसल्याची जाणीव झालेल्या ट्रम्प यांना आता याबाबतीत चीनची मदत होईल, अशी आशा वाटत आहे.

जगातील दोन प्रबळ आर्थिक महाशक्तींनी आपापले व्यापारहित जपण्यासाठी केलेला हा तह आहे. त्यामुळे जागतिक अनिश्चितता काही काळासाठी संपुष्टात येईल. अमेरिका आणि चीनशी ताणलेले संबंध लक्षात घेता तिसरी आर्थिक महाशक्ती बनण्याची महत्त्वाकांक्षा बाळगळताना भारताला आपल्या भू-राजकीय आणि आर्थिक हिताच्या दृष्टीने या तहाचा तात्पुरता आणि दीर्घकालीन अर्थ काय असू शकतो, याचा विचार करावा लागेल. त्यासाठी ताणलेले संबंध दुरुस्त करण्याच्या ट्रम्प-जिनपिंग यांनी अवलंबिलेल्या नीतीचा भारतालाही अवलंब करावा लागेल.

# जखमी बिबट्यास भूल देऊन वनविभागाने केले जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : राहुरी तालुक्यातील धानोरे गावातील श्री रमेश सुखदेव दिघे यांच्या शेतात शुक्रवारी सकाळी एक जखमी बिबट्या दिसून आला. वनविभागाच्या तत्परतेमुळे त्या



बिबट्यास भूल देऊन सुरक्षितरित्या जेरबंद करण्यात आले. रमेश दिघे हे गट क्रमांक ३२०/२ मधील शेतात गवत आणण्यासाठी गेले असता त्यांना बिबट्या दबकत जवळ येताना दिसला. घाबरलेल्या दिघे यांनी तात्काळ गावकऱ्यांना बोलावले. काही अंतरावरून निरीक्षण केल्यावर बिबट्या जखमी असल्याचे लक्षात आले. त्यांनी तत्काळ वन्यजीव प्राणीमित्र विकास म्हस्के यांना संपर्क साधला. म्हस्के यांनी लगेचच घटनास्थळी धाव घेतली आणि अहिल्यानगरचे उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, सहाय्यक उपवनसंरक्षक गणेश मिसाळ, संगमनेरचे अधिकारी अमरजित पवार आणि राहुरी वनपरिक्षेत्र अधिकारी सुनिल साळुंखे यांना घटनेची माहिती दिली. काही वेळातच राहुरी वनविभागाची टीम घटनास्थळी दाखल झाली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन संगमनेर रेस्क्यू टीमला पाचारण करण्यात आले. टीममधील एक्सपर्ट संतोष पारधी, अरुण साळवे आणि प्रविण चव्हाण यांनी गण सज्ज करून ऊसाच्या शेतात प्रवेश केला.पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रदीप सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष पारधी यांनी पहिल्याच प्रयत्नात बिबट्यास भूल देऊन बेशुद्ध केले. त्यानंतर प्राणीमित्र आणि वनकर्मचाऱ्यांनी बिबट्यास काळजीपूर्वक ऊसाच्या शेतातून बाहेर काढले. हा सहा ते सात वर्षांचा मादी बिबट्या असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. घटनेची माहिती पसरताच ग्रामस्थांची मोठी गर्दी जमली होती, मात्र रमेश दिघे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी सहकार्य केले. मोहीम यशस्वी पार पाडल्याबद्दल उपस्थितांनी संतोष पारधी आणि रमेश दिघे यांचा टाळ्यांच्या गजरात गौरव केला. वनविभागाच्या तत्परतेमुळे संभाव्य अनर्थ टळला असून ग्रामस्थांनी दिलेल्या सहकार्याचेही कौतुक होत आहे.

# अतिवष्टीचे अनुदान रक्कम मिळण्यासाठी तहसीलदार यांना निवेदन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : सन २०२५ खरीप अतिवृष्टी अनुदान रक्कम तत्काळ वंचित शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग व्हावी यासाठी टाकळीभान येथील अतिवृष्टीतील अनुदानापासून पासून वंचित शेतकऱ्यांचे निवेदन श्रीरामपूरचे तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांना देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, यावर्षी खरीप पिकाचे अति जास्त पाऊस झाल्यामुळे सोगणीला आलेल्या खरीप पिकाचे १००% टक्के नुकसान झाले आहे व आजही हा पाऊस थांबलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची अतोनात नुकसान झालेले आहे आणि शासनाने जी काही मदत शेतकऱ्यांना देऊ केलेली आहे ती दिवाळी पूर्वी मिळेल अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती. परंतु आज दिवाली होऊन १० दिवस झाले तरी तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर ही अनुदानाची रक्कम जमा झालेली नाही व जे काही शेतकरी अनुदानापासून वंचित आहेत त्यांची काही प्राथमिक स्वरूपातील शेतकऱ्यांची यादी आम्ही आपणास देत आहे व या यादी व्यतिरिक्तही मोठ्या प्रमाणात तालुक्यातील अनेक शेतकरी




अनुदानापासून वंचित आहे त्यांना पण आपण विलंब अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करण्यास मदत करावी हे ही आपणास नम्र विनंती आहे कारण ते खरिपाचे संपूर्ण पिक तर वाया गेलेलेच आहे आणि पुढे रब्बी हंगामाच्या पेरणीची तयारी शेतकऱ्याला करायची आहे तरी आपण शेतकऱ्यांना अति तातडीने शासनाने दिलेले अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यावर जमा न केल्यास आठ दिवसांनी आम्ही सर्व शेतकरी आपल्या तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करू असा इशाराही शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी शेतकरी राजेंद्र कोकणे, प्रा.कार्लस साठे, प्रा. जयकर मगर, बापूसाहेब शिंदे, सुजित बोडखे आदी उपस्थित होते. निवेदना बरोबर ७० अतिवृष्टी अनुदानापासून वंचित शेतकऱ्यांची यादी तहसीलदार यांना देण्यात आली. यावेळी तहसीलदार वाघ यांनी निवेदन स्वीकारून शासनाची अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने जमा होत असल्याचे सांगितले. तसेच शेतकऱ्यांना अनुदान जमा होण्यासाठी फार्मर आयडीची नोंदणी बंधनकारक असल्याचे सांगितले.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकात्मता दौड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : अहिल्यानगर जिल्हा पोलीस दल व नेवासा पोलिस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने देशाच्या एकता व अखंडतेसाठी नेवासा येथे राष्ट्रीय एकात्मता दौड काढण्यात आली.या दौडचे नेतृत्व नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी केले. दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे,अप्पर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाघचौरे,उपविभागीय पोलीस अधिक्षक निरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आलेल्या दौडचा शुभारंभ नेवासा येथील श्री खोलेश्वर गणपती मंदिर चौकापासून करण्यात आला. ''भारत माता की जय''वंदे मातरम'' ''हम सब एक है'',जय ''जवान जय किसान''अशा घोषणा देत हातात तिरंगा घेत दौडमध्ये सहभागी युवक नागरिकांनी सर्वांना आकर्षित केले. नेवासा न्यायालयाच्या प्रांगणात दौडचा समारोप करण्यात आला.

यावेळी पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी दौड मध्ये सहभागी झालेल्या पदाधिकारी व नागरिकांचे स्वागत करत प्रास्ताविक केले.देशाचे पहिले गृहमंत्री असलेले सरदार वल्लभभाई पटेल यांचे देशासाठी योगदान व त्यांचे जीवनकार्य त्यांनी आपल्या प्रास्तविकात विषद केले. देशाची एकता व अखंडता मजबूत करण्यासाठी हातात हात घालून काम करा असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले.

यावेळी नेवासा न्यायालयाचे न्यायाधीश सुनील भोसले, न्यायाधीश विलास मोरे,तहसीलदार डॉ.संजय बिरादार, गटविकास अधिकारी संजय लखवाल,नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील,जनसेवक संजय सुखदान,भाजप युवा मोर्चाचे राज्य सचिव निरंजन डहाळे,नेवासा बार असोसिएशनचे अध्यक्ष अँड.अजय रिंधे,सौदामिनी ग्रुपच्या संस्थापिका सौ.अमृताताई नळकांडे,डॉ. करणसिंह घुले यांनी आपल्या मनोगतातून राष्ट्रीय ऐक्य निर्माण करणाऱ्या दौडचे कौतुक करून राष्ट्रीय ऐक्य जोपासण्यासाठी सर्वांनी एकत्र या असे आवाहन करून उपस्थित नागरिकांना जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या.



यावेळी झालेल्या दौड प्रसंगी,पोलीस पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव कोलते,नेवासा तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष अँड.अजय रिंधे,जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष अँड.लक्ष्मण घावटे,उपाध्यक्ष अँड.सुदामराव ठुबे,डॉ.भाऊसाहेब घुले,डॉ.विष्णूकांत देवरे,विमा अधिकारी किशोर गारुळे,असिफभाई पठाण, राष्ट्रीय कुस्ती पंच संभाजी निकाळजे,दिलीप जगदाळे, इम्रान दारूवाले,नेवासा प्रेस क्लबचे अध्यक्ष मोहन गायकवाड,निरंजन डहाळे,पोलीस पाटील दिलीप गायकवाड,भाजपचे शहराध्यक्ष मनोज पारखे,अँड. जानकीराम डौले, डॉ. वरुणराज देवरे,अमरनाथ ग्रुपचे अंबादास इरले,शशिकांत नळकांडे,रामनाथ जाधव, जालिंदर गवळी,पांडुरंग मते,अजित नरुला,जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक असिफ शेख,शिक्षक अण्णासाहेब शिंदे यांच्यासह नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी,पोलीस बांधव,महिला पोलीस, होमगार्ड दलाचे जवान,पोलीस पाटील संघटना,पोलीस मित्र संघटना, मॉर्निंग वॉक ग्रुपचे सदस्य,विविध संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते झाले होते. प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ.करणसिंह घुले यांनी आभार मानले.

# पोलीस विभागाची 'रन फॉर युनिटी' एकता दौड उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : शेवगाव पोलीस स्टेशनच्या वतीने दि. ३१ऑक्टोबर रोजी सकाळी ७ते ८या वेळेत सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्ताने शेवगाव शहरात रन फॉर युनिटी – एकता दौड हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर एकता दौड माननीय छत्रपती शिवाजी महाराज चौक – क्रांती चौक – डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक – गाडगे बाबा चौक – छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गे पार पडली. या कार्यक्रमासाठी शेवगाव पोलीस स्टेशनचे ६ पोलीस अधिकारी व ३५ पोलीस अंमलदार, तसेच भारदे हायस्कूल शेवगाव येथील एनसीसी चे विद्यार्थी उपस्थित होते. याशिवाय शेवगाव शहरातील सायकल संघटना, माजी सैनिक, शेवगाव शहरातील पत्रकार बांधव व प्रतिष्ठित नागरिकांनी देखील उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.




# जिल्ह्यातील राखीव जागा रिपब्लिकन पक्षाला द्या
## शिर्डीत रिपाईच्या बैठकीत मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : येत्या स्थानिक स्वराज्य संस्था व नगरपालिकेच्या राखीव असलेल्या जागांवर रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाला द्याव्यात अशी मागणी शिर्डी येथे आयोजीत उतर नगर जिल्हा बैठकी प्रसंगी करण्यात आली. शिर्डीतील साई संगम या ठिकाणी रिपाईची बैठक पार पडली. यावेळी जिल्हा संपर्क प्रमुख श्रीकांत भालेराव, जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, राजाभाऊ कापसे, युवा जिल्हाध्यक्ष पप्पू उर्फ प्रदिप बनसोडे, दिपक गायकवाड, भिमा बागूल, कैलास शेजवळ, राहाता तालुका अध्यक्ष धनंजय निकाळे, अनिल रणनवरे, सुनिल शिरसाठ, अशिष शेळके, विकी कापसे, नाना त्रिभूवन आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्वच पदाधिकाऱ्यांनी येत्या जिप पंचायत समिती व नगर पालीकेच्या होवू घातलेल्या निवडणूका वर पक्षाची भूमिका विषद केली. रिपाई हा पक्ष सत्ताधारी महायुती चा घटक पक्ष असल्याने सतेत वाटा मिळावा म्हणून राखिव जागा असलेल्या ठिकाणी रिपाई च्या उमेदवार दिल्यास महायुतीचा धर्म पाळला




जावा अशी पक्षाची भूमिका आहे . जिल्ह्याचे पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे यांना पक्षाची भूमिका सांगण्यात येणार असून तशी मागणी करणार आहे. राखीव जागावर उमेदवारी देताना जे रिपाईशी एकनिष्ठ आहेत त्यांनाच स्थान मिळायला हवे. आजपर्यंतचा अनुभव पहाता रिपाईशी संबंध नसलेल्या किंवा नव्याने पक्षात आलेल्यांना संधी दिली जाते हे होवू नये म्हणून पक्षात जे लोक इच्छूक असतील त्यांची यादी जिल्हाध्यक्षांकडे सादर करून भाजपाच्या राज्य कमिटी कडे देवून ती यादी पालकमंत्री कडे पोहचवतली जाणार, याबाबत पक्षाचे अध्यक्ष केंद्रीम मंत्री ना रामदास आठवले यांचेशी चर्चा करून अंतिम भूमिका घेणार असल्याचे संपर्क प्रमुख श्रीकांत भालेराव यांनी सांगितले. बैठकीस संगमनेर राहूरी कोपरगाव श्रीरामपूर अकोले तालुक्यात शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# निसर्गाची लहरीपणा

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे कारण सध्या निसर्गाचा लहरीपणा वाढत चालला आहे. निसर्गाच्या लहरीपणाचा अभ्यास करणारे हवामान खातेही निसर्गापुढे हतबल ठरत आहे कारण हवामानासंबंधीचा अंदाज बांधणे त्यांनाही कठीण होत आहे. पुर्वी ज्याप्रमाणे हवामान होते तसे हवामान आता राहिले नाही. सध्या सतत हवामान बदलत असते. निसर्गाचा लहरीपणा वाढला आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीन ऋतूत जसे हवामान होते तसे आता राहिले नाही. जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाचे असतात मात्र गेल्या काही वर्षात आपल्या देशात वर्षभर पाऊस पडतो असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण वर्षभर कोठेना कोठे अवकाळी पाऊस, गारा तसेच चक्रीवादळे होतच असतात. आताही पहा ना नोव्हेंबर महिना सुरू झाला तरी पावसाने विश्रांती घेतली नाही. नोव्हेंबर महिन्यातही राज्यातील अनेक भागात पाऊस सुरू आहे. आंध्रप्रदेश आणि ओडिशाच्या समुद्र किनाऱ्यावर मोंथा नावाचे चक्रीवादळ धडकले आहे. या चक्रीवादळाने राज्यातच नाही तर देशात मुसळधार पावसाचा अदाज वर्तवला जात आहे. सहा महिने झाले तरी पाऊस थांबायचे नाव घेत नाही. पावसाळाच नाही तर उन्हाळा आणि हिवाळ्याचीही तीच गत आहे. उन्हाळ्यात तर तापमान ४० अंशाच्या पुढे जाते पूर्वी उन्हाळ्यात सरासरी तापमान ३५ ते ३८ अंशाच्या दरम्यान असायचे ते आता ४० अंशावर गेले आहेत. अलीकडे ऋतुमान बदलत आहे कोणत्याच ऋतूची सुरवात वेळेवर होत नाही उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. आता हेच पहा नोव्हेंबर महिन्यात पूर्वी कडाक्याची थंडी पडत असे आता मात्र नोव्हेंबर महिना उजाडूनही थंडीचा साधा लवलेशही नाही. जून मध्ये येणारा पाऊस जुलै संपत आला तरी दडी मारतो आणि आला तर असा येतो की दोन दिवसात दोन दिवसांची सरासरी भरून काढतो. मात्र अशाप्रकारच्या पावसाची आपल्याला गरज नसते कारण या पावसाने आपले नुकसानच होते. निसर्गाच्या या अवकृपेचे संकट केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगावर आले आहे. अर्थात या बदलत्या हवामानाला आणि निसर्गाच्या लहरीपणास ग्लोबल वॉर्मिंगला जबाबदार धरले जात आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ. जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान वाढते तेंव्हा ग्लोबल वॉर्मिंगची समस्या उदभवते. ग्लोबल वॉर्मिंगची समस्या दिवसेंदिवस वाढत जाईल असा इशारा जागतिक हवामान खात्याने दिला आहे त्यामुळे यापुढे हवामानात बदल हे होतच राहणार आणि त्यामुळे निसर्गाचा लहिरपणा देखील वाढणार आणि तीच चिंतेची बाब आहे अर्थात हवामानातील बदल आणि त्यामुळे होणारी निसर्गाची अवकृपा ही केवळ ग्लोबल वॉर्मिंगमुळे होत आहे असे म्हणणे म्हणजे स्वतःच्या चुकीवर पांघरून घालण्यासारखे आहे. निसर्गातील बदलाला जितके ग्लोबल वॉर्मिंग जबाबदार आहेत तितकेच आपण म्हणजे मानव देखील जबाबदार आहोत. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभारली. बेसुमार वृक्षतोड केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन केले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. निसर्गावर अतिक्रमण करून निसर्गावर अन्याय केला. नदी नाल्यांचा मार्ग बदलला. या सर्व कारणांमुळे पृथ्वीवरील हवामान बदलत आहे. सजीवांना विशेषतः मानवाला जगण्यासाठी प्राणवायूची गरज असते. मात्र मानवाच्या चुकांमुळे स्वार्थामुळे हवेत घातक रसायनांचे आणि प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सतत होणाऱ्या जंगलतोडीमुळे जंगलाखालील एकूण क्षेत्र २० टक्क्यांपेक्षा खाली आले आहे त्याचा मोठा परिणाम हवामान बदलावर झाला आहे. हवामान बदलामुळे निसर्गाचा लहरीपणा वाढला आणि निसर्गाने आपल्यावर अवकृपा करण्यास सुरवात केली. भारत हा कृषिप्रधान देश असून भारतातील ७० टक्के नागरिक शेती आणि त्याला पूरक असणारे व्यवसाय करतात. निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसत आहे. बदलत्या हवामानमुळे कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्री वादळे अशा नैसर्गिक आपत्तींना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यामुळे अनेकांनी शेती करणेच बंद केले आहे तरुण वर्गाने गाव सोडून थेट शहर गाठले आहे. परिणामी गावे ओसाड होत आहे तर शहरांची लोकसंख्या वाढत आहे. हवामान बदलाचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर देखील होत आहे. हवामान बदलामुळे श्वसनाचे आणि इतरही आजार वाढत आहे. निसर्गाचा लहरीपणाचा परिणाम केवळ मानवावरच नाही तर पशु पक्षी आणि सजीवांवर देखील होत आहे एकूणच निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवरच होत आहे. निसर्गाची जर अशीच अवकृपा राहिली तर त्याचा परिणाम केवळ आपल्यालाच नाही तर येणाऱ्या पिढीला देखील भोगावा लागेल म्हणून या बदलत्या हवामानाची आणि त्यामुळे होणाऱ्या निसर्गाच्या अवकृपेची मानवाने गंभीर दखल घ्यायला हवी. हवामान बदलामुळे होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन मानवाने आतापासूनच सकारात्मक पावले उचलायला हवीत. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत केवळ आपल्यालाच नाही तर संपुर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# एन्काऊंटर गाजणार ! सरकारवर टीकेची झोड होणार !!

सरकारकडे आपल्या ठेकेदारीचे पैसे अडकले अनेक प्रयत्न करू नये ते मिळाले नाहीत म्हणून एका ठेकेदाराने मुलांना शिकवण्याच्या बहाण्याने व त्यांच्या चित्रफितींची चांचणी घेण्यासाठी बोलावलेल्या मुलांना ओलीस ठेवले ही बाब पोलिसांनी मुलांच्या रक्षणाचा विचार करून गंभीर घेतली. त्यांची सुटका करण्यासाठी पोलिसांनी त्या ठेकेदाराचा एन्काऊंटर केला. ज्याचे एन्काऊंटर झाले तो पुण्याचा रहिवाशी असलेला रोहीत आर्या हरोळीकर आहे.

हरोळीकर विविध कामांची ठेकेदारी घेत होता. त्यांच्या कामाची प्रशंसा मंत्री सुद्धा करत होते. त्याच्या कामाचे पैसे थकल्याने किंवा थकवल्याने मुलांची ऑडिशन्स घेण्याच्या निमित्ताने त्याने मुलांना ओलीस ठेवले व त्यांना धमकावले ही बाब पोलिसांकडे जाताच पोलिसांनीत्या त्या स्टुडिओमध्ये प्रवेश मिळवून हातातील बंदूकधारी हारोळीकर वर निशाणा साधला आणि पोलिसांच्या गोळीने त्याचा काही वेळात प्राण गेला.मुलांना पोलीस ठेवण्याची रोहित हारोळीकर याच्या कृतीचे कुणीही समर्थन करणार नाही पण या घटनेच्या मागे सरकारी यंत्रणा आणि त्यातून वेगळ्या वळणावर नेणारे संबंधित अधिकारी असू शकतात म्हणजेच प्रशासनाच्या गलथान आणि पारदर्शक नसलेल्या बाबीचे हे उदाहरण आहे अनेक ठेकेदारांचे पैसे देणे मोठ्या प्रमाणात बाकी असल्याचे अनेक वेळा वृत्तपत्रातून छापून आलेले आहे.

अनेकदा ठेकेदारांकडून अगोदरच मलिदा खाऊन घेणाऱ्या यंत्रणा या प्रकारांना कारणीभूत ठरतात.त्यामुळे दर्जेदार कामे होत नाहीत लोकांच्या पैशाचा भ्रष्टाचार होतो आणि नागरी समस्या पूर्णपणे समाधानकारक सुटत नाही.पोलिसांनी केलेल्या एन्काऊंटरचे समर्थन सुद्धा सहजासहजी कोणी करणार नाही .विरोधी पक्ष तर सरकारवर टीकेची झोड करण्याची संधी सोडणार नाही.ठेकेदारीमध्ये पारदर्शकता आली पाहिजे. कधी कधी ठेकेदार पैसे घेतात पळून जातात, कामे अर्धवट सोडतात ,निकृष्ट दर्जाची कामे करतात यामागे सुद्धा संबंधित खात्यांचे मार्गदर्शक असलेले मंत्री आणि अधिकारी असतात.सध्याची एन्काऊंटर झालेली घटना मुंबईतील उच्चभ्रू असलेल्या पवई सारख्या भागातील आहे.पोलिसांनी ज्याला संपवला तो रोहित आर्या कोणी रेकॉर्ड वरचा सराईत गुन्हेगार अथवा अतिरेकी नव्हता . एकेकाळी त्याच्या कामाचे कौतुक झालेले होते ते नजरेआड करता येणार नाही पण त्याने ऑडिशन साठी आलेल्या मुलांना डांबून ठेवले हे पण समर्थनीय नाही.

नमन श्री. पद्माकर शिंपी मो.९४२३७८५८७४

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# लोकप्रतिनिधींचा हलगर्जीपणा : विवेक कोल्हे

## कोपरगावातील बिकट रस्त्यांवरून निष्पाप नागरिकांचे बळी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** - येथील येवला नाक्यावर झालेल्या अपघातात २९ वर्षीय आदित्य देवकर या युवकाचा मृत्यू झाल्याची घटना दुर्दैवी आहे. अशा अनेक दुर्घटना कोपरगावच्या लोकप्रतिनिधींच्या हलगर्जीपणामुळे होत असुन कोपरगावातील रस्त्यांच्या दयनीय अवस्थेवरही संताप व्यक्त करत राज्यकर्ते म्हणून सर्वांनी गांभीर्याने काम करण्याची गरज आहे असे युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी मत व्यक्त केले आहे.



विवेकभैय्या कोल्हे म्हणाले, कोपरगावातील खड्डेमय रस्त्यावर अनेक निष्पाप नागरिकांचे जीव गेले आहेत,पण लोकप्रतिनिधी मात्र निर्धास्त आहेत.अनेकदा चार हजार कोटींच्या विकासाच्या वल्गना करण्यात आल्या. प्रत्यक्षात नागरिक अजूनही रस्ते, पाणी, वीज आणि आरोग्य समस्यांना सामोरे जात आहेत.कोपरगाव मतदारसंघात या अवस्थेवर शासन आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष द्यावे,अशी मागणी त्यांनी केली.

शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी वनविभागाला आवाहन करताना म्हणाले,राहाता व कोपरगाव परिसरात बिबट्यांच्या वाढत्या वावरामुळे शेतकरी आणि ऊसतोड कामगार व नागरिक भीतीच्या सावटाखाली काम करत आहेत. ऊसतोड हंगाम सुरू होण्यापूर्वी वनविभागाने योग्य बंदोबस्त करावा, अन्यथा कामगारांच्या जीवीताला धोका निर्माण होऊ शकतो त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे.तसेच त्यांनी सांगितले की, कोपरगाव तालुक्यातील बेरोजगारी दूर करण्यासाठी संजीवनी युवा प्रतिष्ठानने केलेल्या मागणीवरून सोनेवाडी एमआयडीसी मंजूर झाली.तिथे नवीन उद्योग उभे राहून त्यामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक आहे असेही विवेकभैय्या कोल्हे म्हणाले.

आगामी काळात नगरपालिका जिल्हा परिषद पंचायत समिती काही ग्रामपंचायत अशा विविध निवडणुका आहेत. आता कार्यकर्त्यांची निवडणूक असल्याने त्यात पूर्ण शक्तीनिशी कार्यकर्त्यांना ताकद देऊन गुलाल घेण्यासाठी सज्ज होण्याचे भाष्य त्यांनी केले आहे.

द•ख•ल

## थोरात कारखान्याच्या कर्मचाऱ्यांना १०% वेतन वाढ



**संगमनेर** : थोरात कारखान्याने कायम सभासद ऊस उत्पादक शेतकरी कामगार यांच्या जीवनात आनंद निर्माण केला असून मागील हंगामामध्ये ३२०० प्रति टन भाव दिला आहे. याचबरोबर कामगारांना वेळेत पगार व २०% बोनस व ३० दिवसांचे सानुग्रह अनुदान दिवाळीनिमित्त दिली असून १ जानेवारीपासून कर्मचाऱ्यांना १० टक्के वेतन वाढ देण्यात येणार असल्याचे मा कृषी व महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या ५८ व्या गळीत हंगाम प्रसंगी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी मा.आ.डॉ.सुधीर तांबे हे होते. तर व्यासपीठावर व्हा.चेअरमन पांडुरंग पाटील घुले, सौ.कांचनताई थोरात, रणजीतसिंह देशमुख, सुधाकर जोशी, संपतराव डोंगरे, लक्ष्मणराव कुटे,कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात, रामहरी कातोरे, शंकरराव खेमनर, सौ.मीराताई शेटे, संचालक संतोष हासे, इंद्रजीत खेमनर, डॉ.तुषार दिघे आदी उपस्थित होते.

## सोनई बसस्थानकावर प्रवाशांची गर्दी

**सोनई** : दिवाळीनंतरचा माहेरी जाणाऱ्या महिलांसह प्रवाशांची ये-जा सुरू झाली आहे. त्यामुळे गेल्या आठवडाभरापासून सोनई बसस्थानकावर मोठी गर्दी दिसून येत आहे.सामान्यतः ओस पडणारे बसस्थानक सध्या महिला, मुले आणि सामानाने खचाखच भरले आहे. काही बसेस बंद असल्याने प्रवाशांना खाजगी वाहनांचा चढ्या दराने वापर करावा लागत आहे. राहुरी-सोनई मार्गावर बसेस कमी असून फेऱ्या वाढवण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.दरम्यान, एसटी महामंडळाच्या विविध सवलती योजनांमुळे 'लालपरी' बसेस पूर्ण क्षमतेने धावत आहेत. गर्दीच्या पार्श्वभूमीवर प्रवासादरम्यान चोरी व गैरसोय टाळण्यासाठी वाहतूक नियंत्रक आर. एन. कदम यांनी प्रवाशांना दक्ष राहण्याचे आवाहन केले आहे.

## हरणांच्या कळपांची भटकंती

### अतिवृष्टीचा फटका वन्य प्राण्यांनाही



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : परिसरात गेल्या काही दिवसांपासून पावसाचे प्रमाण वाढले असून दररोजच कमी-जास्त प्रमाणात सरी कोसळत आहेत. २७ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या परिस्थितीचा परिणाम आता फक्त शेतकऱ्यांवरच नव्हे, तर वन्यप्राण्यांवरही झाल्याचे दिसून येत आहे.

अतिवृष्टीमुळे अनेक शेतांमध्ये पाणी साचले असून चिखलामुळे शेतांमध्ये जाणे कठीण झाले आहे. त्यामुळे वन्यप्राण्यांना खाण्यासाठी पुरेसा हिरवा चारा उपलब्ध नाही. चाऱ्याअभावी आणि पाणथळ परिस्थितीमुळे अनेक प्राणी अन्नाच्या शोधात गावकुसाशी येत आहेत. त्यामुळे सध्या पुणतांबा परिसरात हरणांच्या कळपांची भटकंती सुरू आहे.खरीप पिकांची सोंगणी आणि काढणी जवळपास संपली असून रब्बी हंगामाची पेरणी निसर्गावर अवलंबून आहे. दरम्यान, अतिवृष्टीमुळे गेल्या महिनाभरात मोर, लांडोर, कोल्हे आणि बिबट्या यांसारख्या वन्यप्राण्यांच्या हालचालीत घट झाली आहे. मात्र हरणांचे कळप मात्र अन्नाच्या शोधात सतत फिरताना दिसत आहेत. एकूणच, अतिवृष्टीमुळे केवळ शेती आणि शेतकरी वर्गच नाही तर वन्यजीवसुद्धा अडचणीत आले आहेत. परिसरातील निसर्गसंतुलन आणि पर्यावरणीय परिस्थितीवर याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचे स्थानिक ग्रामस्थ सांगत आहेत.

## 'मी' पणा सोडा, चांगले कर्म करा : डॉ. नलावडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : मानवी जीवन अतिशय सुंदर आहे. ते आनंदाने जगण्यासाठी प्रत्येक क्षणाचा आस्वाद घ्या. जे काही चांगले आहे ते स्वीकारा, 'मीपणा' सोडा आणि चांगले कर्म करत राहा. जीवनात यश प्राप्त करण्यासाठी वास्तवात राहून आनंदाने जीवन जगणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी केले.



महात्मा फुले कृषी विद्यापीठात दीक्षारंभ-२०२५ या कार्यक्रमाच्या निमित्ताने स्पर्धेशिवाय यश या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. नलावडे यांनी भूषविले.

कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते म्हणून पुणे येथील विश्वकुलम संस्थेचे संस्थापक इंजि. विश्वनाथ पाटील उपस्थित होते. ते स्पर्धेशिवाय यश या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले,

जीवनात प्रत्येक टप्प्यावर स्पर्धा असते, आणि याच स्पर्धेतून तणाव निर्माण होतो. या तणावामुळे आपण आपल्या जीवनातील खरा आनंद हरवून बसतो. म्हणून यशस्वी होणे म्हणजे नेमके काय हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. आयुष्यात प्रत्येक गोष्ट प्रेमाने, आनंदाने करा. दुसऱ्याशी तुलना न करता वास्तव स्वीकारा आणि प्रत्येक क्षण आनंदाने जगा.

ते पुढे म्हणाले, भविष्यातील यश मिळविण्यासाठी केलेली तयारी हीच खरी संपत्ती ठरते. आपले आयुष्य आपल्या ताब्यात असले पाहिजे. परिस्थिती जशी आहे तशी स्वीकारून, सकारात्मकतेने पुढे जाणेच खरे यश आहे.या प्रसंगी कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र गडगे, अक्षय ऊर्जा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. विरेंद्र बारई, तसेच सहाय्यक कुलसचिव वैभव बारटक्के व्यासपीठावर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कैलास कांबळे यांनी केले. अमेय घाणेकर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. महेश पाचारणे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीरामपूरमध्ये राष्ट्रीय एकता दिवस साजरा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** :श्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंती निमित्त संपूर्ण देशभर राष्ट्रीय एकता दिवस साजरा केला जात आहे. भारत देशाची एकता, अखंडता आणि संप्रभुतेचा संदेश पसरवण्यासाठी श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर, तहसीलदार मिलिंद वाघ आणि छायाचित्रकार कृष्णा सुरडकर उपस्थित होते. कार्यक्रमाद्वारे नागरिकांना राष्ट्रीय एकतेचा संदेश दिला गेला.

## आत्महत्येस कारणीभूत गोरक्षकांवर कारवाईची मागणी

### कोल्हार येथे धनगर समाजाचा रास्ता रोको आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : श्रीरामपूर तालुक्यातील गळनिंब येथील अनिकेत सोमनाथ वडीतके यास मारहाण करून सोशल मीडियावर बदनामी करणाऱ्या व त्याच्या आत्महत्येस कारणीभूत ठरणाऱ्या कथाकथित गोरक्षकावर गुन्हे दाखल करून तात्काळ अटक करावी या मागणीसाठी आज शुक्रवारी कोल्हार येथील आनंद ऋषी चौकात धनगर समाजाच्या वतीने नगर मनमाड राज्य मार्गावर रास्ता रोको आंदोलन करून डीवायएसपी अमोल भारती यांना निवेदन देण्यात आले.



**कोल्हार** येथे नगर मनमाड राज्य मार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी यशवंत सेनेच्या वतीने डीवायएसपी अमोल भारती यांना निवेदन देण्यात आले.( छाया- गणेश कुंभकर्ण)

दिनांक २७ ऑक्टोबर रोजी आपल्या स्वतःच्या गाडीतून गाई घेऊन काकाकडे सोडवण्यासाठी जात असताना कथाकथित गोरक्षक राकेश पवने दिनेश राकेचा प्रशांत राकेचा यांनी त्याची गाडी अडवून बेदम मारहाण केली तसेच त्याची सोशल मीडियावर बदनामी करून त्याच्या आत्महत्येस कारणीभूत ठरले या कथाकथित गोरक्षकांवर गुन्हा दाखल करून वाढीव कलमे लावून त्यांना तात्काळ अटक करावी या मागणीसाठी आज कोल्हार येथील नगर मनमाड रस्त्यावर दीपक बोराडे यशवंत सेनेचे विजय तमनर यांच्या मार्गदर्शनाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी दीपक बोराडे व विजय तमनर यांनी पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले व त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल तीव्र संताप व्यक्त केला. यावेळी डीवायएसपी भारती म्हणाले की आम्ही चारही आरोपींना अटक करणार आहोत तपास कामी आम्हाला सहकार्य अपेक्षित आहे.

## वडाळा महादेवची ग्रामसभा कोरमअभावी तहकुब

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : वडाळा महादेव येथे नियोजित ग्रामसभा कोरम अभावी तहकुब करण्यात आली असून यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शासनाच्या निर्देशानुसार ग्रामपंचायत स्तरावर विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्याचे आदेश ग्रामविकास विभागाकडून देण्यात आले असले तरी, वडाळा महादेव ग्रामपंचायतीकडून ग्रामस्थांना सभेबाबत पूर्वकल्पना किंवा माहिती देण्यात आली नव्हती, अशी तक्रार ग्रामस्थांकडून करण्यात आली.

ग्रामसभेची नोटीस योग्य वेळी देण्यात न आल्याने नागरिकांना उपस्थित राहता आले नाही. या पार्श्वभूमीवर येथील जागरूक नागरिक आणि होतकरू तरुणांनी संबंधित अधिकारी व ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्याकडे चौकशी केली. नागरिकांना सभेबाबत कळवणे आणि सूचना प्रसिद्ध करणे बंधनकारक असतानाही तसे न झाल्याचे निदर्शनास आले.या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते सुहास राठोड आणि त्यांच्या मित्रमंडळाने ग्रामपंचायत प्रशासनाला आठ दिवसांपूर्वीच लेखी मागणी केली होती की ग्रामसभा जुनी ग्रामपंचायत कार्यालयात घेण्यात यावी. मात्र, सरपंच व पदाधिकारी यांनी ही मागणी दुर्लक्षित करत सभा नवीन ग्रामपंचायत भवनासमोर घेण्याचा निर्णय घेतला. परंतु, ग्रामसभेच्या वेळी फक्त दोनच सदस्य उपस्थित असल्याने कोरमअभावी सभा तहकुब करण्यात आली. यामुळे ग्रामस्थांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले.या वेळी सुहास राठोड यांनी ग्रामपंचायतीकडून सुरू असलेल्या मनमानी कारभारावर टीका करत, गावाचा कारभार लोकशाही मार्गाने, पारदर्शक धोरण ठेवून आणि सर्व ग्रामस्थांचा विश्वास संपादन करूनच चालवावा, अशी मागणी केली. तसेच या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली.



## 'शिर्डी के साईबाबा' फेम सुधीर दळवी यांची प्रकृती चिंताजनक

### शिर्डीकरांकडून मदतीचा हात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : बहुचर्चित 'शिर्डी के साईबाबा' या चित्रपटातील साईबाबांची भूमिका साकारून संपूर्ण देशभरात साईभक्तांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते सुधीर दळवी सध्या आजारी असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांच्या उपचारासाठी शिर्डीकरांनी एकजूट दाखवत तब्बल पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

'शिर्डी के साईबाबा' या चित्रपटामुळे साईबाबांची कीर्ती आणि महती अख्ख्या जगभर पोहोचली. त्या भूमिकेतून सुधीर दळवी यांनी साईबाबांच्या व्यक्तिमत्त्वाला जिवंत रूप देत साईप्रचारात मोठे योगदान दिले.

त्यांच्या प्रकृतीबाबत माहिती मिळताच शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते यांनी ही बाब शिर्डीकरांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांच्या या पोस्टनंतर शिर्डी शहरात भावनिक वातावरण निर्माण झाले. तत्काळ ग्रामस्थ, स्वयंसेवी संस्था आणि श्रद्धाळूंनी एकत्र येऊन मदत उभारण्याचा निर्णय घेतला.



रामनवमी उत्सवाच्या निधीतील शिल्लक सुमारे साडेचार लाख रुपये आणि काही ग्रामस्थांच्या वर्गणीतून मिळालेली रक्कम अशा एकूण पाच लाख रुपयांची मदत शिर्डीकरांनी देण्याचे ठरवले आहे. ही रक्कम ग्रीन अँड क्लीन शिर्डी संस्थेचे पदाधिकारी स्वतः सुधीर दळवी उपचार घेत असलेल्या रुग्णालयात भेट देऊन सुपूर्द करणार आहेत.शिर्डीकरांच्या या संवेदनशील उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. तसेच दळवी यांच्या लवकर प्रकृती सुधारासाठी मारुती मंदिरासमोर महाआरतीचे आयोजन करण्यात येणार आहे.

## पोलीस दलाच्या वतीने एकता दौड स्पर्धेत १,००० विद्यार्थ्यांचा सहभाग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : भारताचे कणखर आणि दूरदर्शी नेतृत्व असलेले सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशाची अखंडता आणि एकता अबाधित राखण्यासाठी मोलाचे योगदान दिले. या युगपुरुषांच्या कार्यातून आणि विचारांतून प्रेरणा घेऊन प्रत्येक भारतीय नागरिकांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घ्यावा, असे आवाहन आ. अमोल खताळ यांनी केले.

राष्ट्रीय एकता दिनानिमित्त आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त संगमनेर उपविभाग व संगमनेर शहर पोलीसांच्या वतीने आयोजित एकता दौड स्पर्धेचा शुभारंभ आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते झेंडी दाखवून करण्यात आला.या वेळी व्यासपीठावर संगमनेर उपविभागाचे पोलीस उपाधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख, शिवसेनेचे शहरप्रमुख दिनेश फटांगरे विनोद सूर्यवंशी भाजप तालुकाध्यक्षा पायल ताजणे, तसेच पोलीस अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, देश स्वतंत्र झाल्यानंतर खरी एकात्मता टिकवण्याचे काम सरदार वल्लभभाई पटेल यांनी केले. जुनागढ, काश्मीर आणि हैदराबाद या संस्थानांच्या विलिनी करणाच्या वेळी त्यांनी दाखवलेली कणखर भूमिका खर्या अर्थाने देशाच्या अखंडतेसाठीऐतिहासिक ठरली.त्याग, शिस्त आणि राष्ट्रीय एकतेचा आदर्श प्रत्येक भारतीयाने त्यांच्या जीवना तून घ्यावा. असाही सल्ला आ खताळ यांनी देत पोलीसभरतीसाठी तयारी करत शहरातील विविध अकॅडमीचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा सहभाग पाहून आ खताळ यांनी समाधान व्यक्त केले . या स्पर्धेत विजेत्या सर्व स्पर्धकांचे अभिनंदन करून आगामी होत असणाऱ्या पोलीस भरतीच्या कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या. यावेळी संगमनेर शहराचे पोलीसनिरीक्षक रवींद्र देशमुख यांनी एकता दौड स्पर्धा घेण्यामागचा उद्देश आपल्या प्रस्ताविका तून यावेळी उपस्थितांना दिला




भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्यावतीने एकता दौड आयोजित करून आपल्या भारताची एकात्मता अखंडता कायम अबाधित राहण्याचा संदेश देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली आहे

**-डॉ कुणाल सोनवणे,**
**पोलीस उपअधीक्षक संगमनेर उपविभाग**

अहिल्यानगर पोलीस संगमनेर उप विभाग आणि संगमनेर शहर पोलीस दलाच्या वतीने घेण्यात आलेल्या एकता दौड स्पर्धेत पुरुष गटाची स्पर्धा संगमनेर नगर पालिका क्रीडा संकुल ते नाशिक महामार्ग (१३२ केव्ही अकोले बाय पास) या मार्गावर तर मुलींची स्पर्धा संगमनेर नगरपालिका क्रीडा संकुल ते कृषी उत्पन्न बाजार समिती या मार्गावर घेण्यात आली. सर्व विजेत्या स्पर्धकांना आमदार अमोल खताळ पाटील यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच सर्व सहभागी विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना प्रमाण पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्यात खालील प्रमाणे मी विजेते स्पर्धक.

**ज्येष्ठ नागरिक गट** - १)अशोक नवले- प्रथम २) गणेशकुमार बाहेती- द्वितीय ३) दीपक क्षत्रिय - तृतीय

**मुलांचा गट** - १) सुरज अनिल कदम - प्रथम २) विशाल नंदू थोरात - द्वितीय ३) विजय रामनाथ सोनवणे - तृतीय

**मुलींचा गट** - १) धनश्री दत्तू हुलगिर - प्रथम २) वर्षा बाळासाहेब बर्डे - द्वितीय ३) रूपाली मच्छिंद्र सोडणर - तृतीय

**जाहीर नोटीस** ता.३१/१०/२०२५

तमाम लोकास विशेषतः श्रीरामपुर नगरपरिषद हददीतील लोकांना या नोटीसने कळविणेत येत आहे की खालील परिशिष्ट मधिल नमुद मिळकत हि गुणवंती प्रताप ठक्कर व पुनम अजय दुआ यांनी विपीन हिरालाल चुडीवाल यांचेकडुन ता.२९/१२/२०१४ रोजी रजि. खरेदीखत दस्त नं.४४९०/२०१४ अन्वये खरेदी घेतलेली होती पुढे सदरील मिळकत आमचे अशिल यांनी गुणवंती प्रताप ठक्कर व पुनम अजय दुआ यांचेकडुन खरेदी घेतलेली आहे. मात्र गुणवंत प्रताप ठक्कर व पुनम अजय दुआ यांचेकडील खरेदीखत मुळ दस्त गहाळ झालेला आहे तो अनेक प्रयत्न करूनही शोध घेउनही सापडत नाही सदरील दस्त सार्वजनिक ठिकाणी गहाळ झालेची गुणवंती प्रताप ठक्कर व पुनम अजय दुआ यांची खात्री झाली आहे. जर यदाकदाचित सदरील दस्त सापडलेस आमचे अशिल यांना खालील नमुद पत्यावर देणेत यावा.

**परिशिष्ठ अ** - मौजे श्रीरामपुर येथील नगरपालीका हद्दीतील सर्व्हे नं.६०/२/२ पैकी सिसनं. २०५३/२ पैकी टिपी स्किम नं.५ प्रारूप अन्वये फायनल प्लॉट नं.१५ ते १८ पैकी यासी एकुण क्षेत्र ६५३.८० चौ.मि. या क्षेत्रामधिल गौरव रेसीडेन्सी या नावाने निवासी सदनिका असलेली तिन मजली मिळकत या इमारती मधिल स्टिल्थ पहिले मजल्यावरील सदनिका नं.१०७ यासी एकुण क्षेत्रफळ ५३.८९ चौ.मि.

ही नोटीस आमचे अशिल यांचा पत्ता महेश सुधाकर जोशी वार्ड नं.७ श्रीरामपुर मोबाईल नं. ०८७६६७७२९९०.

**ॲड. शुभम मनेश काकाणी**
**करपे प्लॉट राहुरी**
**मोबाईल नं.८६२३८९३३५१**

## येवले आखाडा येथे चाचा तनपुरेंच्या नेतृत्वाखाली गुप्त बैठक

# चाचा तनपुरे भाजपाशी हातमिळवणी करणार की भाजपात प्रवेश करणार?



**प्रतिनिधी । राजेंद्र परदेशी**

**राहुरी :** राहुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पद एसटी प्रवर्गासाठी आरक्षित झाले. निवडणुक अगदी तोंडावर येऊन ठेपली असतानाच राहुरीतीलआजी माजी नगरसेवक व इच्छुक उमेदवार गुडघ्याला बाशिंग बांधून तयार झाले आहेत. त्यातच आता चाचा तनपूरे यांच्या नेतृत्वाखाली विकास मंडळाने कार्यकर्त्यांच्या गुप्त बैठका सुरु केल्याने सदर निवडणुक आता मोठ्या चुरशीची होणार असल्याची चिन्हे आता दिसत आहेत.

गेल्या चार वर्षापासून प्रतिक्षेत असलेल्या नगरपरिषद निवडणुका नुकत्याच जाहीर करण्यात आल्या. नगरपरिषद नगराध्यक्ष पदाची आरक्षण सोडत नुकतीच मुंबई येथे जाहिर करण्यात आली. राहुरी नगरपरिषद नगराध्यक्ष पद एसटी प्रवर्गातील पुरुषसाठी आरक्षित झाले. त्यामुळे नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक मातब्बरांच्या स्वप्नांचा चक्काचूर झाला. नगरपरिषद हद्दीत एकूण १२ प्रभागांची रचना करण्यात आली असून प्रत्येक प्रभागात एक पुरुष व एक महिला असे दोन नगरसेवक आणि एकूण २४ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. आजी माजी नगरसेवक व इच्छुक उमेदवारांनी आप आपल्या पद्धतीने मोर्चे बांधणी सुरु केली आहे. चाचा तनपूरे यांच्या नेतृत्वाखाली विकास मंडळाने कार्यकर्त्यांच्या गुप्त बैठका सुरु केल्या आहेत. काल सायंकाळी शहरातील येवले आखाडा येथे चाचा तनपूरे यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांची एक गुप्त बैठक झाल्याची माहिती समोर आली. या बैठकीत नगरपरिषद निवडणुकी बाबत चर्चा झाली. मात्र विकास मंडळ सदर निवडणुक स्वतंत्र लढणार कि, तनपूरे गटाशी युती करणार या बाबत काहीच चर्चा झाली नाही.

विधानसभा निवडणुकीत विकास मंडळाने तनपूरे गटाशी युती केली होती. नगरपरिषद निवडणुकीत पून्हा युती झाल्यास तनपूरे गटाची ताकद वाढणार हे निश्चित आहे. वंचित बहुजन आघाडी कडून स्वतंत्र पॅनल होणार असल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे सदर निवडणुक तिरंगी होणार असल्याचे चिन्ह दिसत आहे. तरीदेखील या निवडणूकीत चाचा तनपूरे व विकास मंडळ नेमकी काय भूमिका घेणार याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे. मात्र निवडणूक जशी जशी जवळ येऊ लागली आहे तशी तशी रंगत येऊ लागली आहे.

## पान १ वरुन

### ३० जूनपर्यंत कर्जमाफी

आमच्या जाहीरनाम्यात शेतकरी कर्जमाफीबाबत घोषणा केली होती. त्यासंदर्भात आम्ही मागच्या काळात एक समिती स्थापन केली होती. उपाययोजना कशा करायच्या याचा निर्णय केला होता. कर्जमाफी हा एक भाग आहे. शेतकरी वारंवार कर्जाच्या विळख्यात अडकत आहे. पण त्यांना बाहेर कसं काढता येईल याचा आम्ही विचार करत आहोत. यादृष्टीने आम्ही मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परदेशींच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती कर्जमाफीसंदर्भात कशा पद्धथीने करता येईल, निकष काय असतील, भविष्यात शेतकरी कर्जाच्या विळख्यातून बाहेर कसे येतील त्यासंदर्भात अभ्यास करणार आहे. एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात या समितीने आपलं काम काज पूर्ण करावे. कर्जमाफीसाठी काय निकष असावेत यासंदर्भातील अहवाल या समितीने द्यावा असे मुख्यमंत्री म्हणाले.

या अहवालावर कर्जमाफीसंदर्भातील निर्णय ३० जून २०२६ पर्यंत करु असे मुख्यमंत्री म्हणाले. आम्ही सगळे टप्पे ठरवले आहे. सगळ्या शेतकरी नेत्यांशी आमची सकारात्मक चर्चा झाल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी उच्चाधिकार समितीची' स्थापना करण्यात आली आहे. प्रहारचे प्रमुख बच्चू कडू यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारनं हा निर्णय घेतला आहे. समितीच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्र्यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार व मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परदेशींच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

### सारखं माफ, सारखं फुकट...

कोरोना काळात धर्म जात कुठं होती, कारण त्यावेळी संकट होतं त्यानंतर जर आपण स्थिरस्थावर झालो की हे विखारी विचार समोर यायला लागल्याचे कडू म्हणाले. काल दोन अडीच तास वाद घालून ३० जूनला २०२६ का होईना सातबारा कोरा करायचं आश्वासन घेतले आहे. त्यांचे मी अभिनंदन करतो, तोपर्यंत जे थकबाकी दार शेतकरी आहेत त्यांना बँकेचा तगादा लावू नका अशी विनंती आहे असे शेट्टी म्हणाले. थकीत हंगाम संपला आहे, उसाचे उत्पादन घटले आहे. मला वाटत नाही कारखाने ३० जानेवारीच्या पुढं चालतील असे शेट्टी म्हणाले. ऊस तोडीला पैसे देऊ नका सगळ्यांना तोड मिळेल. उसाला दर मिळावा यासाठी आम्ही आहोत आम्ही यांना सोडत नाही असे शेट्टी म्हणाले. एफआरपी एकरकमी द्यावी, अशी मागणी केली आहे. पहिली उचल चांगली असेल तर आमचा प्रॉब्लेम सुटतो तर आमचं शून्य टक्के व्याज कर्ज फिटतं. यावर्षी ऋछझ वर २०० ते ३०० रुपये अधिक दिले पाहिजे असे शेट्टी म्हणाले.

### राज ठाकरेंकडून भावनिक मुद्दे काढण्याचा प्रयत्न : शिवेंद्रराजे भोसले

आधी ईव्हीएम मशीन बदलावर बोलून झालं. निवडणूक आयोगानं सिद्ध करून दाखवा म्हटलं होतं. ते सिद्ध करता आलं नाही. आता मतदार याद्यांवर सुरू झालं आहे. विरोधकांचे बिनबुडाचे आरोप आहेत. यापेक्षा राज्यातील इतर प्रश्न महत्त्वाचे आहेत. त्यामुळं महायुती सरकारचं लक्ष तिकडं आहे. मतचोरी, मतदार यादी, निवडणूक आयोग असं करतंय, असं म्हणून स्वतःचे अपयश दुसऱ्यावर खपवण्याचा प्रयत्न विरोधक करत आहेत, अशी टीका यावेळी शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केली.

### शिर्डी विमानतळावर स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकरीची मागणी पूर्ण

मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.मौजे काकडी येथे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने शेतकऱ्यांची जमीन वाटाघाटीने घेतली होती आणि स्थानिकांना नोकरी देण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, पात्रता असूनही स्थानिकांच्या मुलांना सुरुवातीला नोकरी मिळालेली नव्हती. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. या प्रकरणात माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे आणि युवा नेते विवेक कोल्हे यांचा पुढाकार कौतुकास्पद ठरला असून ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहेत. उपोषण मागे घेण्यात आले असून स्थानिकांना नोकरी मिळाल्याने प्रशासकीय निर्णयाचे स्वागत होत आहे.

### ऊस दराबाबत योग्य वेळी निर्णय घेवू : आ. काळे

दिली असली तरी नैसर्गिक परिस्थिती अनुकूल नाही मागील सहा महिन्यापासून पाऊस सुरु असून आजही ऊसाच्या शेतात पाणी साचलेले असून सुरुवातीस साखर उतारा हा कमीच राहणार आहे. शेतातील ऊस पिकाची वाढ चांगली झाल्याचे दिसून येत असले तरी पाऊस व वादळाने ऊसाचे पिक पडलेले अशा परिस्थीतीत टनेजमध्ये वाढ झाल्यास उद्दिष्टापेक्षा जास्त गाळप करता येईल. मात्र चालू हंगामात साखर उतारा कसा मिळतो त्यावरच साखर उत्पादन अवलंबून राहणार आहे. चालू वर्षी सर्वच ठिकाणी समाधानकारक पाऊस झालेला असून विहिरीच्या पाणी पातळीत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व के.टी. वेअर व बंधारे पाण्याने पुर्ण भरलेले आहे. गोदावरी कालव्यांनाही हमखास ४ ते ५ रोटेशन मिळतील असा अंदाज आहे.

## सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त 'रन फॉर युनिटी'व वृक्षारोपण




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त गंगापूर पोलिस ठाण्याच्या वतीने शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर सकाळी 'रन फॉर युनिटी' या धावण्याच्या उपक्रमाचे आयोजन करुन उद्घाटन उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश पालवे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले.तसेच वृक्षारोपण करण्यात आले

या धावण्याची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरातील श्री संत शिरोमणी सेना महाराज चौकातून करण्यात आली. यानंतर सहभागी नागरिकांनी एकता आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश देत लासूर मार्गावरील पारख मैदानावर या उपक्रमाचा समारोप केला.

सरदार पटेल यांच्या जयंतीनिमित्त गंगापूर पोलीस स्टेशन परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन देखील करण्यात आले. या प्रसंगी उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश पालवे,पोलीस निरीक्षक कुमारसिंग राठोड, संदेश गंगवाल, डॉ. उद्धव काळे, बाबासाहेब गायके, उद्योजक संतोष अंबीलवादे युसूफ मौलाना, गोपनीय शाखेचे मनोज नवले,पोलीस अंमलदार अमीत पाटील, भागवत खाडे,शेख नईम, वैभव नागरे, लक्ष्मण पंडित, शोभा दांडगे, रेणुका धारकर, अमोल पठाडे, विनोद पवार, राजू कुकलारे व पोलीस कर्मचारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाद्वारे गंगापूर पोलिसांनी राष्ट्रीय एकता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.

### पंचगंगा साखर कारखाना गळीत हंगामाचा शुभारंभ

**माळवाडगांव :** पंचगंगा उद्योग समुहाच्या महालगांव येथील पंचगंगा शुगर पॉवर प्रा.लि.या खाजगी साखर कारखान्याचा व्दितीय गळीत हंगाम शुभारंभ आज शनिवार दि.१ नोव्हेबर रोजी सकाळी ११ वाजता महंत रामगिरी महाराज ,ऊत्तमरांव शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे.

पंचगंगा साखर कारखाना व्दितीय गळीत हंगाम महंत रामगिरी महाराज ,ऊतमरांव गोविंदरांव शिंदे यांच्या हस्ते आज सकाळी ११ वाजता संपन्न होणार असून या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून आ. रमेश बोरनारे, आ.विठ्ठलरांव लंघे, हे उपस्थित राहणार आहे. ऊस उत्पादक शेतकरी पंचक्रोशितील ऊस वाहतुकदार तसेच हॉर्वेस्टर मालक चालक,ऊसतोड मुकादम यांनी उपस्थित रहावे असे आवाहन कारखाना अध्यक्ष प्रभाकरराव शिंदे, संचालक कुंडलिकरांव माने, चॉर्टर्ड अकौंटंट भाऊरांव गायकवाड यांनी केले आहे.

### अशोकनगरला उद्या जिल्हा कबड्डी निवड चाचणी

**श्रीरामपूर :** अहिल्यानगर जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने जिल्हा किशोर/किशोरी गट निवड चाचणी कबड्डी स्पर्धा येत्या रविवार, दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा रामराव आदिक पब्लिक स्कूल, निपाणी अशोकनगर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर येथे पार पडणार आहे.

या निवड चाचणीमध्ये जिल्ह्यातील सर्व संघटना व कबड्डी खेळाडूंनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष अविनाश आदिक यांनी केले आहे.

या निवड चाचणीच्या माध्यमातून जिल्हास्तरावरून गुणवंत खेळाडूंची निवड करण्यात येणार असून, आगामी राज्यस्तरीय स्पर्धांसाठी ही एक महत्त्वपूर्ण संधी ठरणार आहे.

कबड्डीप्रेमी खेळाडू व प्रशिक्षकांनी आपल्या संघासह वेळेत उपस्थित राहून सहभाग नोंदवावा, असेही आवाहन आयोजकांनी केले आहे.



## स्टिल चोरी प्रकरणातील आरोपींच्या आवळल्या मुसक्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** लासूर स्टेशन येथील गीताबन या ठिकाणावरून काही दिवसापूर्वी पिकअप वाहनाद्वारे पाच चोरट्यांनी अडीच लाख रुपयांची स्टील चोरून पोबारा केला होता मात्र शिल्लेगाव पोलिसांनी सिताफिने त्या चोरट्यांना मुद्देमालासह पकडून पाच आरोपींना बेड्या ठोकल्या असल्याची माहिती शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी दिली आहे.

गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन येथील गीताबन येथून डॉ.निलेश हरिकिसन मुंदडा व व्यापारी किशोर कोठारी यांच्या बांधकाम चालू असलेल्या ठिकाणावरून अडीच लाख रुपयांचे स्टील अनुक्रमे २० ऑक्टोबर व २९ जानेवारी रोजी स्टील अज्ञात चोरट्यानी चोरून नेल्याची तक्रार शिल्लेगाव पोलीस ठाण्यात दिली होती त्यामुळे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलीस अधीक्षक डॉ.विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंग, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.निलेश पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश काळे,बिट अंमलदार तात्याराव बेद्रे, हनुमंत सातपुते, राजेंद्र निसर्ग, सुरेश भिसे, रवी दाभाडे,रवी कीर्तिकर,पो.कॉ.चव्हाण,अर्जुन तायडे यांचे पोलीस पथक तयार केले या पथकाने स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करून अवघ्या काही दिवसातच रामदास कोंडीबा खाटोल, मुक्तार गफ्फार शेख, गौरीशंकर ओमप्रकाश राठोड, प्रतीक रामेश्वर बोंगाणे, शुभम राकेश सिंग सर्व रां. वाळूज ता.गंगापूर या संशियतांना ताब्यात घेऊन त्यांना पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली या चोरट्यांकडून गुन्ह्यात वापरलेली टाटा पिकअप वाहन क्रमांक चक/२० इ/ ३७८१ संपूर्ण मुद्देमालासह जप्त करण्यात आले आहे.

## तब्बल २७ वर्षानंतर विद्यार्थी आले एकत्र



**गंगापूर :** शिल्लेगाव येथील सोसायटी हायस्कूल मध्ये गेट-टुगेदरचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला ९७/९८ त्याच्या विद्यार्थ्यांनी तब्बल २७ वर्षानंतर एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक वेद्धु पवार तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणू मुख्याध्यापक बापू पानकडे, सय्यद शेख,शिव व्याख्याते दीपक वाबळे, कुलकर्णी,सावंत,अंकुश जाधव,कडू जाधव,अनिता वाघ, विश्वनाथ नरोडे,चंदन हजारे यांची उपस्थिती होती

यावेळी विद्यार्थ्यांनी आपला परिचय देऊन कोणकोणत्या क्षेत्रात काम करतात सर्वा समक्ष मानला यावेळी सर्वांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थी व विद्यार्थिनीची जास्तच जास्त उपस्थिती पाहून कार्यक्रमाला येणाऱ्या गुरुजन वर्गांना अति आनंद झाला २७ वर्षाच्या भेटीत अनेकांचे चेहऱ्यामध्ये फार बदल झालेला होता एकमेकांची ओळख करून देताना जो आनंद जो उत्साह आज दिसत होता त्यावेळी प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थिनी ही २७ वर्ष मागे जाऊन हा एक दिवस सर्व आपापल्या संसारातील सुख दुःख बाजूला ठेवून परत एकदा शाळेतील एक दिवस ज्याप्रमाणे घालवायचा त्याचप्रमाणे घालवला

विद्यार्थ्यांमध्ये डॉक्टर सचिन पवार ,गणेश नरोडे, अन्वर शेख ,कृष्णा चंदेल, रोहिदास वाघ, ज्ञानेश्वर खंडागळे, दादासाहेब साळुंके ,विकास राऊत, अनिल चव्हाण , ज्योती चव्हाण ,ज्योती वाघ ,मंगल चव्हाण, मंगल साठे ,कल्पना भिवाडे, सुनीता भालेराव ,भीमा चंदेल, उज्वला जगताप ,सुलताना शेख, यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

सूत्रसंचालन ज्ञानेश्वर डोंगरे यांनी केले

## निधन वार्ता..

### कुसुमबाई गायकवाड



**श्रीरामपूर :** येथील कुसूमबाई देवराव गायकवाड (वय ८७) यांचे बुधवार, दि. २९ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात सात मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या प्रगतशील शेतकरी सतीश गिरमे, सुधीर बोरावके, दत्तात्रय शिरसाठ, धनंजय बधे, गौतम टिळेकर व सागर घोडेकर यांच्या सासुबाई तर निलेश सुभाष बोरावके व प्रतिक सुधीर बोरावके यांच्या आजी होत. श्रीरामपूर प्रगत बागायतदार सोसायटीचे माजी चेअरमन स्व. देवराव फकिरबा गायकवाड यांच्या त्या पत्नी होत.

### किसन यशवंत हांडे



**गणोरे :** येथील प्रगतशील शेतकरी किसन यशवंत हांडे (८०) यांचे नुकतेच वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी तीन मुले, एक मुलगी सुना,नातु, पंतु असा मोठा परिवार आहे.आदर्श इंग्लीश स्कुल वडगाव लांडगा या शाळेचे जेष्ठ शिक्षक बाबासाहेब हांडे, प्रगतशील शेतकरी मोहन व विमा प्रतिनिधी दत्तात्रय हांडे यांचे ते वडील होत.

### अरुण वखरे



**टाकळीभान :** येथील अरुण अंबादास वखरे वय (६७) वर्षे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, भाऊ, बहीण, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. शिवाजी वखरे यांचे ते ज्येष्ठ बंधू तर एसटी वाहक गणेश वखरे यांचे ते वडील होत.

## 'नीतीमूल्य गमावलेल्यांना पाठिंबा देऊ नये..'

**श्रीरामपूर :** अशोक सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाच्या शुभारंभासाठी महंत रामगिरी महाराज यांना दिलेले निमंत्रण मागे घ्यावे, अशी विनंती कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांनी पत्राद्वारे केली आहे.

शेतकऱ्यांनी पत्रात नमूद केले की, भ्रष्टाचार, अनैतिक कृत्ये आणि बलात्काराच्या गुन्ह्यात अडकलेल्या व्यक्तीस पाठबळ देणे हे संत परंपरेला शोभणारे नाही. काही वर्षांपूर्वी अशाच कार्यक्रमात महाराजांचा अपमान झाल्याची आठवणही त्यांनी करून दिली.

शेतकऱ्यांनी पुढे म्हटले आहे की, जर महाराजांनी कार्यक्रमास हजेरी लावलीच, तर कारखान्याने शेतकऱ्यांना मागील हंगामातील ३०० रुपये बाकी व येत्या हंगामातील उसाला छ३५५० प्रती टन दर द्यावा. या पत्रावर जितेंद्र भोसले, नीलेश शेडगे, सुनीता वानखेडे, शीतल पोकळे, सोनाली विटेकर, संदीप गवारे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

## नशिबाची परिक्षा

**शनिवार दि.३१ ऑक्टोबर २०२५**

### मिलनम डे

| उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|
| १३० २४८ २२० **४-५** १४० १५९ ११३ | जोड ४७-९५-६२-०३-५८ |

### कल्याण

| उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|
| १४० २९० ७८० **५-४** १३० २४८ ४४६ | जोड ५१-६४-७२-०९-४३ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|
| सुटी | जोड सुटी |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 28/04/2025 to 03/05/2025 | 789 43 256 | 128 14 167 | 345 25 168 | 150 69 180 | 136 05 159 | 127 00 569 |
| 05/05/2025 to 10/05/2025 | 135 98 116 | 479 04 112 | 136 03 148 | 123 62 138 | 158 47 269 | 257 45 258 |
| 12/05/2025 to 17/05/2025 | 233 82 336 | 569 00 389 | 278 74 590 | 288 83 157 | 389 08 468 | 690 57 160 |
| 19/05/2025 to 24/05/2025 | 900 99 360 | 190 00 145 | 167 47 340 | 237 21 137 | 179 72 129 | 390 26 367 |
| 26/05/2025 to 31/05/2025 | 148 30 145 | 259 61 128 | 470 16 457 | 125 81 678 | 790 65 690 | 247 38 170 |
| 02/06/2025 to 07/06/2025 | 229 34 455 | 899 62 138 | 778 21 470 | 244 02 336 | 255 23 247 | 110 24 248 |
| 09/06/2025 to 14/06/2025 | 579 11 335 | 990 89 568 | 356 40 578 | 160 76 790 | 158 44 167 | 133 75 159 |
| 16/06/2025 to 21/06/2025 | 578 07 115 | 220 42 138 | 446 48 125 | 148 33 599 | 278 72 390 | 689 34 770 |
| 23/06/2025 to 28/06/2025 | 159 53 247 | 125 81 236 | 279 81 137 | 248 48 800 | 256 31 344 | 349 64 590 |
| 30/06/2025 to 05/07/2025 | 145 06 349 | 470 14 699 | 334 02 660 | 470 15 780 | 369 89 126 | 223 75 267 |
| 07/07/2025 to 12/07/2025 | 189 81 380 | 233 88 224 | 378 88 189 | 699 41 335 | 248 48 125 | 458 77 467 |
| 14/07/2025 to 19/07/2025 | 789 44 248 | 116 85 140 | 138 28 189 | 359 72 138 | 689 36 268 | 678 13 346 |
| 21/07/2025 to 26/07/2025 | 790 68 350 | 678 10 299 | 389 05 456 | 377 71 669 | 378 82 345 | 150 61 678 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

द•ख•ल

## एकरी १०० टन ऊस उत्पादन घेत कुरुमकर पाटील यांचा विक्रम

**लिंपणगाव :**श्रीगोंदा तालुक्यातील मुंढेकरवाडी येथील प्रगतशील शेतकरी प्रदीप संभाजी कुरुमकर यांनी त्यांच्या शेतीतून एकरी तब्बल १०० टन ऊसाचे उत्पादन काढून एक आदर्श घालून दिला आहे. ऊस पिकाच्या योग्य व्यवस्थापन, सेंद्रिय व रासायनिक खतांचा वापर आणि वेळोवेळी केलेल्या कीडनियंत्रण उपायांमुळे हे उत्पादन मिळाल्याचे त्यांनी सांगितले. कुरुमकर यांनी ऊस लागवड करताना आधुनिक



तंत्रज्ञानाचा वापर केला असून ऊस उत्पादन वाढवण्यासाठी जमिनीची सुपीकता राखणे, पाट पाण्याचे योग्य नियोजन या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून ऊस उत्पादकांसाठी ते एक प्रेरणास्थान ठरत आहेत. कृषी विभागाने अशा प्रगतशील शेतकऱ्यांचा गौरव करून इतर शेतकऱ्यांपर्यंत त्यांच्या यशस्वी पद्धती पोहोचवाव्यात, अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून होत आहे.

## आईच्या स्मृती प्रित्यर्थ शाळेला गेट भेट

**अमरापुर :** शेवगांव येथील खंडोबानगर मधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला अनेक दिवसांपासून गेट नसल्यामुळे मोकाट जनावरे शाळेच्या परिसरात शिरून वास्तव्य करत होती. परिणामी परिसरात अस्वच्छता निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर धोका निर्माण झाला होता. ही बाब लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्ते सुनील काकडे यांनी आपल्या आई कै. सुमनबाई काकडे यांच्या स्मरणार्थ सुमारे ३५हजार खर्च करून शाळेसाठी नवे गेट बसवून दिले. या उपक्रमामुळे शाळेचा



परिसर सुरक्षित व स्वच्छ झाला असून विद्यार्थ्यांना निरोगी वातावरणात शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. खंडोबानगर ग्रामस्थ, शिक्षकवर्ग आणि पालकांनी या सामाजिक उपक्रमाबद्दल सुनील काकडे यांचे मनःपूर्वक आभार मानले असून त्यांच्या समाजाभिमुख कार्याचे कौतुक व्यक्त केले आहे.

## ३५०० रुपयांचा ऊसभाव शक्य आहेच : प्रताप भोसले



**श्रीरामपूर** ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील जवाहर सहकारी साखर कारखान्याने ऊसाला प्रति टन ३५०० रुपयांचा दर जाहीर केला असून, राज्यभरात शेतकऱ्यांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. याच अनुषंगाने शिर्डी संस्थानचे माजी विश्वस्त तथा शेतकरी नेते प्रताप नाना भोसले यांनी काही दिवसांपूर्वी झालेल्या अशोक सहकारी साखर कारखान्याच्या जनरल मीटिंगमध्ये ठाम मागणी केली होती की शेतकऱ्यांच्या ऊसाला ३५०० रुपयांचा भाव द्यावा. जर कारखाना प्रशासनाला ते शक्य नसल्यास, कारखाना आमच्या ताब्यात द्या; आम्ही शेतकऱ्यांना हा दर देऊन दाखवतो. भोसले यांच्या या वक्तव्याने सभेत उपस्थित शेतकऱ्यांमध्ये टाळ्यांचा कडकडाट झाला होता. त्यावेळी काही जणांनी ही मागणी अवास्तव असल्याचे सांगितले होते. मात्र आता कोल्हापूरच्या जवाहर कारखान्यानेच तोच दर जाहीर केल्याने, भोसले यांची मागणी व्यवहार्य आणि शेतकरीहिताची असल्याचे सिद्ध झाले आहे. या घडामोडीनंतर प्रताप भोसले यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सत्ताधाऱ्यांना पुन्हा थेट सवाल केला आहे आमच्याकडे कारखाना चालवण्याची जबाबदारी द्या; आम्ही सभासद शेतकऱ्यांना ३५०० रुपये प्रति टन दर देऊ. आता सत्ताधाऱ्यांची यासाठी तयारी आहे का? राज्यातील साखर राजकारणात या विधानामुळे खळबळ उडाली आहे. ऊस भावाच्या मुद्यावरून शेतकरी वर्गात चर्चा सुरू असून, भोसले यांची ठाम भूमिका शेतकऱ्यांच्या मनातील भावना व्यक्त करणारी असल्याचे बोलले जात आहे.

# धुमाकूळ घालणारा बिबट्या जेरबंद; शेतकऱ्यांमध्ये समाधान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर:** अनेक दिवसापासून लोणी हवेली परिसरात धुमाकूळ घालणारा बिबट्या अखेर जेरबंद झाला आहे. दुधाडे मळा व कोल्हे वस्ती येथे बिबट्याचा त्रास सुरू होता. ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते, विशेषतः रात्री शेतात पिकांना पाणी देण्यासाठी बाहेर पडणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये घाबराट होती बिबट्या जेरबंद झाल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे. यावेळी उपसरपंच इंजि. अमोल विक्रम दुधाडे यांच्या प्रयत्नातून आणि अनिकेत दुधाडे, आराध्य दुधाडे, श्रीराज दुधाडे, कार्तिक दुधाडे, अविनाश दुधाडे, ओंकार दुधाडे यांच्या सहकार्याने दोन दिवसांपूर्वी दुधाडे मळा (गुलाब फाटा) येथे पिंजरा लावण्यात आला. या कामात वनविभागाचे अधिकारी शेख साहेब यांनी मोलाचे सहकार्य केले. सध्या पावसामुळे



शेतकरी दिवस व रात्री विद्युत पुरवठा करत आहेत; अशा परिस्थितीत बिबट्यामुळे शेतकरी वर्ग भयभीत झाला होता. मात्र आता बिबट्या जेरबंद झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. यावेळी सरपंच जान्हवी दुधाडे, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी थोरे, लहू कोल्हे, कमलेश दुधाडे, महेंद्र दुधाडे, महेश सोंडकर, संतोष दुधाडे, स्वप्निल सोंडकर, अनिल सोंडकर, सुनिल दुधाडे (ग्रामसेवक), बाजीराव दुधाडे, सुरज दुधाडे, संकेत दुधाडे, तुळशीराम दुधाडे, दत्ता दुधाडे, मोहन काकडे, कानिफनाथ दुधाडे, किशोर कोल्हे, बाळासाहेब दुधाडे, भाऊसाहेब दुधाडे, संभाजी दुधाडे, आप्पा दुधाडे, बबन दुधाडे (ढाकणे), अनिल (काका) दुधाडे आदी उपस्थित होते.

## रस्ता दुरुस्त करा अन्यथा रास्ता रोको आंदोलन : शिवाजी पालवे

शिराळ चिचोंडी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** जिल्ह्यामध्ये २६ सप्टेंबर रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे नगर तालुक्यातील बहिरवाडी येथील दारकुंडे वस्ती या ठिकाणी रोड वाहून गेला प्रशासनाच्या माध्यमातून पाहणी करण्यासाठी जिल्ह्याचे प्रांत अधिकारी सुधीर पाटील तसेच नगर तालुका तहसीलदार संजय शिंदे त्याचप्रमाणे प्रशासकीय पदाधिकारी यांनी रोडची पाहणी केली परंतु आज एक महिना पूर्ण होऊन देखील तुटलेल्या रोडची दुरुस्ती झालेली नाही काल झालेल्या पावसामुळे अजून रोड खचला गेला आहे . ७ नोव्हेंबर पर्यंत रस्ता दुरुस्त करावा अन्यथा रस्ताा रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा माजी सैनिक शिवाजी पालवे यांनी दिला आहे.

पाथर्डी तालुक्यातील कोल्हार, उदरमल, चिचोंडी शिराळ, डमाळवाडी, डोंगरवाडी, गीतेवाडी, लोहसर ,राघूहिवरे, सोकेवाडी, मिरी ,माका या परिसरातील शेतकरी विद्यार्थी रुग्ण मोठ्या प्रमाणामध्ये या रस्त्याने हजारो वाहने चालू असतात रस्त्याची परिस्थिती नाजूक झाली असून त्या ठिकाणी मोटरसायकलचा अपघात देखील झाला आहे. प्रशासनाला जय हिंद फाउंडेशन च्या वतीने ७ नोव्हेंबर पर्यंत तुटलेला रस्ता दुरुस्त करावा अन्यथा नाईलाजस्तव जेऊर पंचक्रोशी व चिचोंडी पंचक्रोशी तसेच जय हिंद फाउंडेशन च्या वतीने रास्ता रोको आंदोलन दारकुंडे वस्ती येथे करण्यात येईल असे निवेदन शिवाजी पालवे यांनी प्रांताधिकारी सुधीर पाटील व नगर तालुका तहसीलदार संजय शिंदे यांना माजी सैनिक शिवाजी पालवे माजी सैनिक धर्मनाथ पालवे माजी सैनिक गोरक्ष पालवे दिले आहे.

## शहरातील रस्ते मोकळे करण्यासाठी अतिक्रमण हटाव मोहीम सुरु

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील रस्त्यांवरील अतिक्रमणे आणि स्वच्छतेसंबंधी समस्या अधोरेखित करत अहिल्यानगर महानगरपालिकेकडून शुक्रवारपासून मोठी अतिक्रमण हटाव मोहीम सुरू झाली आहे. आमदार संग्राम जगताप आणि आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत गुरुवारी झालेल्या बैठकीत प्रशासनाने उपाययोजना ठरवल्या. शुक्रवारी सकाळपासून कायनेटिक चौक, बसस्थानक रोड, लालटाकी परिसर आदी ठिकाणी अतिक्रमणे हटवण्यात आली. कायनेटिक चौकात टपऱ्या, दुकानदारांच्या समोर ठेवलेले पत्र्याचे शेड जेसीबीच्या सहाय्याने हटवण्यात आले. सक्कर चौकापासून महावीर कलादालन, मार्केटयार्ड चौकापर्यंत रस्त्यावरील हातगाड्या, टपऱ्या आणि इतर अतिक्रमणे पथकाने हटवली. लालटाकी अप्पू चौकातील दुकानदारांनी रस्त्यावर साहित्य टाकून अतिक्रमण केले होते, तेही जप्त केले गेले. आयुक्त यशवंत डांगे यांनी नागरिकांना स्पष्ट इशारा दिला की, अतिक्रमणे स्वतःहून काढली नाहीत तर महानगरपालिका जेसीबीच्या सहाय्याने हटवेल. यात नुकसान झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. शहरातील नागरिकांनी अनेकदा अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडी, अपघातांची भीती आणि स्वच्छतेसंबंधी समस्या व्यक्त



केल्या आहेत. तथापि, प्रशासनाने आधीही अनेकदा मोहीम सुरू केली होती, पण दीर्घकाळ टिकणारा परिणाम दिसून आलेला नाही. या पार्श्वभूमीवर आता नागरिकांचे सहकार्य ही गरज बनली आहे. आमदार संग्राम जगताप म्हणाले, अतिक्रमण हटाव ही फक्त कारवाई नाही, तर शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी आहे. प्रशासन आणि नागरिकांनी एकत्र काम करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेची मोहीम काही दिवस सुरू राहणार असून, नागरिकांनी स्वतःहून रस्ते मोकळे ठेवले नाहीत तर प्रशासन थेट कारवाई करणार आहे. शहरातील रस्ते मोकळे करणे, वाहतूक सुरळीत करणे आणि स्वच्छता राखणे यासाठी ही मोहीम महत्त्वाची आहे.

## राष्ट्रीय स्पर्धेत पदक जिंकल्याबद्दल स्नेहबंध सोशल फाउंडेशनतर्फे सय्यद यांचा सत्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** – जिल्हा पोलीस दलाचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अनवरअली सय्यद यांनी ५५ व्या वर्षी क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून पोलीस दलाचा गौरव वाढवला. स्पर्धांमुळे पोलीस कर्मचाऱ्यांची शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्ती सुधारते, त्यांच्यातील नेतृत्वगुण आणि सांघिक भावनेला प्रोत्साहन मिळते आणि त्यांना तणावमुक्त राहण्यास मदत होते. सय्यद यांनी राष्ट्रीय स्पर्धेत पदक जिंकून जिल्हा पोलीस दलाचा गौरव वाढवला आहे. त्यांचे हे यश तसेच इतर पोलिसांसाठी प्रेरणादायी, असे प्रतिपादन स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक



अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.

सूरत येथील वीर नर्मदा युनिव्हर्सिटीत झालेल्या नॅशनल वेटरनस मास्टर गेम्स स्पर्धेत जिल्हा पोलीस दलाचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अनवरअली सय्यद यांनी धावण्याच्या प्रकारात यांनी गट ५५ वयोगटात सुवर्ण पदक पटकावले. याबद्दल स्नेहबंध फाउंडेशनतर्फे डॉ. उद्धव शिंदे यांनी त्यांचा सत्कार केला. त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे उपस्थित होते.

सय्यद यांनी ४४ हजार १०० मीटर रिले धावण्याच्या प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आणि सुवर्ण पदक मिळवले.

# शेतकऱ्यांच्या पांढऱ्या सोन्याला यंदा कवडीमोल भाव...!

## कापसाला मिळत आहे फक्त ६ ते ७ हजार रुपये पर्यंत भाव...!

दिपक खोसे | राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव :** शेवगाव तालुक्याच्या दक्षिण भागातील ढोरजळगांव यासह ढोरजळगांव ने, मलकापूर,आखतवाडे,आपेगांव,अव्हाने,माळेगाव,गरडवाडी,भातकुडगांव ,परिसरात शेतकऱ्यांनी यावर्षी कपाशी पिकांची मोठ्या प्रमाणात लागवड केली होती परंतु निसर्गाच्या लहरीपणामुळे आणि झालेल्या अतिवृष्टीमुळे या भागातील कपाशी पिके लावलेल्या शेतात मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी साचून पुर्णपणे वाया गेली आहेत तसेच जे काही थोड्या प्रमाणात राहिलेल्या कपाशी पिकावर लाल्या रोग, बोंडे सडणे, पाते गळ, पीक उन्मळून पडणे, पिकांची वाढ खुंटने, फकडी पडणे यासह आदी रोगांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याने यंदा कापसाच्या उत्पन्नात कमालीची घट होण्याची शक्यता असून काही ठिकाणी कपाशी या पिकावर केलेला खर्च निघू शकत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि त्यातच मात्र सध्या स्थितीत व्यापाऱ्याकडून शेतकऱ्यांनी पिकविलेल्या या पांढऱ्या सोन्याची खरेदी अतिशय तुटपुंज्या व कवडीमोल दरात केली जात आहे. परिणामी शेतकऱ्यांपुढे मोठे संकट उभे राहिले आहे. कापसाला चांगला भाव नसल्याने या भागातील शेतकरी हवालदिल झाला आहे. किमान कापसाला यंदा दहा ते पंधरा हजार रुपये प्रतिक्विंटल भाव मिळायला हवा अशी मागणी परिसरातील शेतकऱ्याकडून होत आहे. शेतकऱ्यांनी मोठे कष्ट करून, घाम गाळून कपाशीचे पीक जगविले मात्र आता शेतकऱ्यांना कापसाचा योग्य तो मोबदला मिळत नसल्याने जो भाव येईल त्या भावाने शेतकरी कापसाची विक्री करताना दिसत आहे. दरवर्षी कापसाचा श्री गणेशा हा दसऱ्याला व्यापाऱ्यांकडून केला जातो त्यामुळे दसरा, दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर काही शेतकऱ्यांनी कापूस काढून विकायला सुरुवात केली. कापूस खरेदी केंद्र सुरू होण्याची वाट न बघता थेट व्यापाऱ्यांना कापूस हा कवडीमोल भावात विकावा लागत आहे. शासनाचे सीसीआय केंद्र लवकर सुरु न झाल्यास त्याचा लाभ व्यापारी घेण्याची शक्यता असून यंदाही व्यापारी अल्पदराने कापसाची खरेदी करत आहेत. बाजार समितीच्या आवारात तसेच आठवडी बाजारात खासगी किरकोळ, ठोक खरेदीदार कापसाची खरेदी करत आहेत. मात्र कापसाला दर्जा नसल्याचे सांगत वाटेल त्या दरात कापूस खरेदी करून शेतकऱ्यांची सर्रास लूट सुरू आहे. कापसाला साधारण १० हजार पासून ते १५ हजार रुपयेच्या प्रति क्विंटल दर मिळणे अपेक्षित आहे. मात्र खाजगी व्यवसायीक चांगल्या दर्जाचा कापूसही ६००० ते ७००० रुपये प्रति क्विंटल



कमी भावात खरेदीचे दृष्टचक्र थांबण्याची चिन्हे नाहीत. जास्त झालेल्या पावसाने आधीच कापूस उत्पादकांचे कंबरडे मोडले आहे तसेच काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असताना जे हाती आले, तेही मातीमोल दराने विकावे लागत आहेत. दर्जा नसल्याचे कारण पुढे करत गावपातळीवर कापूस खरेदी करणारे दराने खरेदी केला जात आहे. मुळात कापूस वेचणीला प्रति किलोला दहा ते पंधरा रुपये मोजावे लागत असताना पन्नास टक्केही रक्कम पदरात पडत नाही. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या कापसाला चांगला भाव देऊन शेतकऱ्या पुढील संकट दूर करावे अशी मागणी या भागातील शेतकऱ्याकडून केली जात आहे.

**शासकीय कापूस खरेदी केव्हा सुरू होणार...!**

परिसरातील शेतकऱ्यांना पडलेला प्रश्न आहे कि, परतीच्या पावसाने कापसाच्या अगोदरच वाती झालेल्या असून जो काही राहिला-साहिला कापूस आहे तो पण शेतकऱ्यांनी सर्व कापूस व्यापाऱ्यांना विकल्यावर शासकीय कापूस खरेदी सुरु होणार का असा प्रश्न कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पडला आहे.

**वेचून आणलेल्या कापसाला दुर्गंधी.......!**

परिसरात सुरुवातीला झालेल्या चांगल्या पावसामुळे कपाशी पीक जोमात होती. या पिकाला कापूसही चांगला फुटला. आता घरात पीक येणार ही परिस्थिती असतानाच झालेल्या अतिवृष्टीमुळे फुटलेला कापूस झाडालाच ओला होत आहे. गळून पडून मातीत खराब होवू नये यासाठी वेचून घरी आणला जात आहे. आता ओल्या कापसाच्या दुर्गंधीने घरात बसणेही कठीण झाले आहे.

**संभाजी फसले शेतकरी**

आज रासायनिक खतांचे भाव हे गगनाला भिडले आहे, रासायनिक औषधांच्या किमतीत देखील भरमसाठ वाढ झाली असून वाढत्या महागाईने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. या परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे कपाशी पिकावर केलेला खर्च निघणे देखील मुश्कील झाले असून आज ६ ते ७ हजार जो भाव कापसाला मिळत आहे तो खर्चाच्या तुलनेत अतिशय कमी भाव असून शासनाने शेतकऱ्यांच्या कापसाला १४ ते १५ हजार रुपये भाव द्यावा.

**शासनाने शेतकऱ्यांची फसवणूक केली :- राजेश फटांगरे शेतकरी**

शेवगाव तालुक्यातील काही खाजगी व्यापारी हे शेतकऱ्यांकडून मनमानी पद्धतीने तसेच मनाला वाटेल त्या भावाने कापूस खरेदी करत असून अशा मनमानी पद्धतीने कापूस खरेदी करणाऱ्या तसेच बेभाव कापूस खरेदी करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यावर प्रशासनाने कारवाई करावी.

**बाळासाहेब फटांगडे:-स्वाभिमानी शेतकरी संघटना.**

**अनधिकृत खरेदी कोण थांबवणार....!**

शेवगाव तालुक्यासह खेडोपाडी, गावोगावी, तसेच आठवडी बाजार असलेल्या गावात खासगी खरेदीदार व्यापाऱ्यांनी सर्रास अनधिकृत दुकाने थाटली आहेत. बहुतांश खरेदीदार हे बाजार समित्यांशी निगडित आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची सर्रासपणे लूट केली जात असताना बाजार समित्या, स्थानिक ग्रामपंचायती अनधिकृत खरेदीकडे दुर्लक्ष करत आहेत.

# अर्णव वाघ याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव:**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे विभागस्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धा २७ व २८ ऑक्टोबर रोजी जिल्हा क्रीडा संकुल वाडिया पार्क अहिल्यानगर येथे संपन्न झाल्या.

येथील रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे विद्यालयाचा विद्यार्थी आणि संजय आनंदकर स्पोर्ट्स अकॅडमी चा खेळाडू अर्णव गोविंद वाघ याने १४ वर्षे वयोगटात ६३ किलो वजन गटांमध्ये सुवर्णपदक पटकावून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड पक्की केली. गोंदिया येथे होणाऱ्या ‘‘राज्यस्तरीय शालेय स्पर्धे‘‘मध्ये अर्णव पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करेल.




याबरोबरच स्पर्धेमध्ये आरव कुलकर्णी याने रौप्यपदक तर यश खाकाळ, अंकित खामकर, शरयू लोंढे, श्रेया आळेकर यांनी कांस्यपदक मिळविले.

विजेते खेळाडू संजय आनंदकर स्पोर्ट्स अकॅडमीचे प्रशिक्षक मास्टर जयेश व सिद्धेश आनंदकर यांच्या मार्गदर्शनाखाली नियमितपणे सराव करतात.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल अर्णव गोविंद वाघ याचे आमदार संग्राम भैय्या जगताप, आमदार विक्रमसिंह पाचपुते, ज्येष्ठ नेते भगवानराव पाचपुते, घनश्याम शेलार, बाबासाहेब भोस, राजेंद्र नागवडे, माजी आमदार राहुल जगताप, जि. प. सदस्य सचिन जगताप, माजी.पं.समिती सभापती सिद्धेश्वर देशमुख, मा. पं. समिती सदस्य बाळासाहेब मनसुके, मांडवगण सेवा सोसायटीचे चेअरमन झुंबरराव बोरुडे, माजी.सरपंच अंबादास घोडके, माजी.चेअरमन दादाराम बोरुडे, सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र घोडके, ग्रँडमास्टर संजय आनंदकर, मुख्याध्यापक दिलीप भुजबळ, क्रीडा विभाग प्रमुख सचिन झगडे यांच्यासह शिक्षक, पालक, खेळाडू यांनी अभिनंदन करत राज्यस्तरीय स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

# शेतकऱ्याच्या न्यायासाठी लढा अखेर यशस्वी !

## माजी सैनिकाचा रस्ता शिवपानंद चळवळीच्या पाठपुराव्याने झाला खुला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :**वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर तालुक्यातील पोटी गावचे माजी सैनिक सुधीर सुडके यांनी गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या शेतीकडे जाणाऱ्या रस्त्याबाबत सातत्याने शासन प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. महसूलमंत्र्यांना ही निवेदन देण्यात आले होते परंतु प्रत्यक्ष कृती न झाल्याने आणि सतत होत असलेल्या प्रशासनाच्या दिरंगाईमुळे त्यांनी अखेर आत्मदहनाचा इशारा देऊन शासनाचे लक्ष वेधून घेतले. या घटनेची गंभीर दखल घेऊन शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी तातडीने पुढाकार घेतला. त्यांनी . महसूल मंत्री, उपजिल्हाधिकारी वाशिम जाधव , तसेच स्थानिक महसूल अधिकारी वर्गाशी सलग संवाद साधून आणि पत्रव्यवहार करून, या प्रकरणात त्वरित कार्यवाही होण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले. अखेर २८ ऑक्टोबर रोजी शेतकरी व चळवळीच्या या सातत्यपूर्ण व ठाम पाठपुराव्यामुळे माजी सैनिक सुधीर सुडके यांचा शेतरस्ता अधिकृतरित्या खुला करण्यात आला. या प्रसंगी उपविभागीय अधिकारी (डूज) मंगरूळपीर, तहसीलदार ,



माजी सैनिक संघटना अध्यक्ष कॅप्टन अतुल एकघरे , तसेच शेतकरी बांधव, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांमध्ये समाधान होते अनेक वर्षांपासूनचा संघर्ष आज फळास आला होता. ग्रामस्थांच्या वतीने माजी सैनिक शेतकरी सुधीर सुडके यांनी महसूल मंत्री, उपजिल्हाधिकारी जाधव , तालुका महसूल प्रशासकीय अधिकारी व दादासाहेब जंगले पाटील यांचे मनःपूर्वक आभार मानले. दादासाहेब जंगले पाटील यांनी सांगितले की,

**राज्यातील शेवटच्या शेतकरी भावाला दर्जेदार हक्काच्या रस्ता मिळवून देण्यासाठी न्यायालय, तहसील, मंत्रालय जिथे जावे लागेल तिथे आम्ही जाऊ. प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या शेतीकडे जाण्याचा रस्ता मिळेपर्यंत ही चळवळ थांबणार नाही.**

**हा प्रसंग केवळ एका रस्त्याचा नाही, तर महाराष्ट्रातील हजारो शेतकऱ्यांच्या हक्कासाठी चाललेल्या लढ्याचे प्रतीक आहे. या चळवळीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय आणि आत्मविश्वास दोन्ही मिळत आहेत.**

**माजी सैनिक सुधीर सुडके**

## गंगामाई साखर कारखान्याचा १५ वा गाळप हंगाम शुभारंभ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगांव** – गंगामाई इंडस्ट्रीज अँड कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि., हरिनगर (ता. शेवगाव, जि. अहमदनगर) या प्रतिष्ठित साखर कारखान्याचा १५ वा गाळप हंगामाचा शुभारंभ शनिवारी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन चेअरमन तथा मुळे उद्योग समूहाचे संस्थापक पद्माकरराव मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी संचालक रणजीत मुळे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. कारखान्याचे ऊस विकास अधिकारी . संजय बहिर व त्यांच्या सुविज्ञ पत्नी स्वाती बहिर यांच्या शुभहस्ते गव्हाण व मोळीची विधिवत पूजा करून गाळप हंगामाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमास परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये विलासराव ढोरकुले, रणजित घुगे, संजय टाकळकर, विष्णुपंत घनवट, अशोकदादा मोटकर, गोकुळ ढोरकुले, मच्छीन्द्र ढोरकुले, सर्जेराव ढाकणे, संभाजी घनवट, बाबासाहेब गर्जे, संदीप खाडे, अशोक क्षिरसागर, कृष्णा क्षिरसागर, तसेच अनेक शेतकऱ्यांचा समावेश होता. कारखान्याचे सर्व खातेप्रमुख, अधिकारी, कर्मचारी व कामगारही या प्रसंगी उपस्थित होते. रणजीतभैय्या मुळे यांनी सांगितले की, या हंगामासाठी कारखान्याची तोडणी, वाहतूक यंत्रणा आणि सर्व प्रशासकीय तयारी पूर्ण झाली असून शासनाच्या नियमानुसार प्रत्यक्ष गाळप सुरू करण्यात येणार आहे.

# द•ख•ल

## दुकानाबाहेर ठेवलेला नवीन टीव्हीची चोरी

**तळेगाव ढमढेरे:** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील तळेगाव रोड येथे दिपक भुजबळ यांचे श्रीराम इलेक्ट्रिकल नावाने इलेक्ट्रिक वस्तू विक्रीचे दुकान असून भुजबळ यांनी ग्राहकाला देण्यासाठी बीपीएल कंपनीचा मोठा टीव्ही त्यांच्या दुकानाबाहेर ठेवलेला होता, काही वेळाने सदर टीव्ही दुकानाबाहेर नसल्याचे भुजबळ यांच्या निदर्शनास आले. यावेळी पाहणी केली असता दुकानाबाहेर ठेवलेला टीव्ही चोरीला गेल्याचे लक्षात आल्याने याबाबत दिपक नारायण भुजबळ (वय २७ वर्षे रा. तळेगाव रोड शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार अजित इंगवले हे करत आहे.

## देशासाठी वल्लभ भाई पटेल व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची मोठे योगदान : नागवडे

**लिंपणगाव :** स्वतंत्र भारताच्या जडणघडणीमध्ये भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल व स्वर्गीय इंदिरा गांधी यांचे योगदान हे चिरस्मरणीय असून त्याच्या कार्यकर्तृत्वामुळेच आज आपला देश खऱ्या अर्थाने यशाच्या शिखरावर उभा राहिला असल्याचे प्रतिपादन सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी केले.

कारखाना कार्यस्थळावर सरदार वल्लभ भाई पटेल यांची



१५० वी जयंती व स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधी यांची ४१ वी पुण्यतिथी निमित्त प्रतिमा पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी नागवडे बोलत होते.

नागवडे पुढे म्हणाले की, सरदार वल्लभाई पटेल यांच्या कणखर भूमिकेमुळेच देश एकसंघ राहिला तर इंदिरा गांधींनी राष्ट्रीयीकृत बँकांची निर्मिती करून देशाच्या अर्थकारणाला नवी दिशा दिली . संपूर्ण देश या महामानवांचा सदैव ऋणी राहील.

यावेळी कारखान्याचे संचालक विठ्ठल जंगले, प्रगतशील शेतकरी डॉ. पाटील, कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे, इतर खाते प्रमुख कामगार व सभासद उपस्थित होते.

## शिक्रापुर येथे पोलिसांसह धावले तीनशे युवक युवती

**तळेगाव ढमढेरे:** शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीच्या निमित्ताने रन फॉर युनिटी अंतर्गत आयोजित राष्ट्रीय एकता दौड कार्यक्रमास पोलिसांसह अनेकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला असून तब्बल तीनशे जण सहभागी झाले होते.

शिक्रापूर (ता. शिरुर) पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस निरीक्षक




दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सरदार वल्लभभाई पटेल जयंतीच्या निमित्ताने रन फॉर युनिटी अंतर्गत आयोजित राष्ट्रीय एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी शिक्रापुर पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी, कर्मचारी, पत्रकार, पोलीस पाटील यांसह गरुडझेप ॲकॅडमी, एक्सलन्स ॲकॅडमी, हिंदवी ॲकॅडमी, व मृत्युंजय ॲकॅडमीचे युवक युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान शिक्रापूर पाबळ चौक ते वाबळेवाडी डाळमिल चौक पर्यंत पोलीस अधिकारी, कर्मचारी, पत्रकार व पोलीस पाटील यांनी धावत जाऊन दौड पुर्ण केली, यावेळी महिला पोलीस कर्मचारी व महिला पोलीस पाटलांसह युवतींची संख्या देखील लक्षणीय होती, सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख, पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे, वेरणनाथ मुत्तनवार, पोलीस हवालदार संदीप कारंडे, नवनाथ नाईकडे, बापू हाडगळे, अतुल पखाले, हेमंत कुंजीर, राहुल वाघमोडे, उमेश जायपत्रे, नारायण सानप, महिला पोलीस हवालदार उज्वला गायकवाड, रुपाली निंभोरे आदींनी विशेष परिश्रम घेतले. दरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख यांनी सर्वांचे आभार मानले.

## बोला पण गडकोटा विषयी स्पर्धेचे आयोजन

**श्रीरामपूर :** येथील युवा व्याख्याते प्रथमेश वर्धावे यांनी 'बोला पण गडकोटांविषयी' या अभिनव स्पर्धेचे आयोजन केले असून छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या गडकोटांविषयीचा इतिहास जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोहोचावा याच उद्देशाने स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धा सर्वांसाठी खुली असून वयाचे आणि भाषेचे बंधन नाही. या स्पर्धेसाठी विषय पुढील प्रमाणे असून - युनेस्कोचा जागतिक दर्जा मिळालेल्या खालील १२ किल्ल्यांपैकी कुठलाही एका किल्ल्यावर म्हणजेच साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, रायगड, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग,पन्हाळा,विजयदुर्ग सिंधुदुर्ग व जिंजी या किल्ल्यांपैकी एका किल्ल्याची माहिती २५ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर पर्यंत व्हिडिओच्या माध्यमातून तीन मिनिटे पर्यंत संयोजन समिती यांना सोबतच्या मो. नं. ९३२५४५६०७७ - पाठवायचे आहे.


महाराष्ट्र शासन वन विभाग

### वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, ओतूर

ता. जुन्नर, जि. पुणे ४१२४७०५

**निविदा सुचना क्र. १ सन २०२५-२०२६**

वन परिक्षेत्र अधिकारी, ओतूर हे त्यांच्याकडील सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात राज्य योजना इको टुरिझम (राज्य) २४०६-२२९५ योजने अंतर्गत खालील प्रमाणे कामांबाबत महाराष्ट्र शासनाच्या नोंदणीकृत कंत्राटदार सुबे, खुला व मजुर संस्था यांचेकडून कामांकरिता बी-१ नमुन्यातील निविदा मागवीत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना या कार्यालयाकडे दि. ०१-११-२०२५ पासुन ०७-११-२०२५ पर्यंत दुपारी १.०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवस वगळुन देण्यात येतील. भरुन पाठविलेल्या निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी, वन विभाग, ओतूर यांचे कार्यालयात दि. ०७-११-२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत स्विकृत करण्यात येतील. निविदा स्विकृतीचे अधिकार वन परिक्षेत्र अधिकारी, ओतूर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**अटी व शर्ती :** १) निविदा धारकांनी सावधानता बाळगून निविदा सादर करण्याच्या किमान १ दिवस आधी सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी. निविदा धारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्तावेज संबंधित कार्यालयात सादर करणे अनिवार्य राहिल अन्यथा निविदा स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. २) सदर कामाबाबत बी १ फॉर्म वन परिक्षेत्र कार्यालय ओतूर येथून निविदा धारक यांनी प्राप्त करुन घ्यावा. ३) ज्या निविदा धारकांची निविदा मंजूर झालेली आहे, त्या कामाचे आदेश प्राप्त होताच ३ दिवसाच्या आत काम सुरु करण्यात यावे अन्यथा सदर निविदा रद्द करण्यात येईल. ४) सदर कामाचा कालावधी सदर काम हे ३१/०३/२०२६ पुर्वीच पुर्ण करणे बंधनकारक राहील. ५) शासन निर्णयान्वावे शासनाने नमुद करण्यात आलेल्या अटी व शर्ती सदर निविदेस लागु असतील. ६) सदर कामांची सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेला आहे.

**वन परिक्षेत्र अधिकारी**
**ओतूर**


# पुणे-नगर महामार्गावर तीन वाहनांचा भीषण अपघात

## १० वर्षीय बालिकेसह १६ प्रवासी जखमी





पुणे नगर महामार्गावर भीषण अपघातग्रस्त वाहने व रुग्णालयात जखमींची विचारपूस करताना पोलीस ( छायाचित्र आकाश भोरडे )

**आकाश भोरडे । राष्ट्र सह्याद्री**
**तळेगाव ढमढेरे :** शिरूर तालुक्यातील कोंढापुरी जवळ पुणे नगर महामार्गावर तीन वाहनांचा भीषण अपघात होऊन तब्बल सोळा प्रवासी गंभीर जखमी होऊन तीन वाहनाचे नुकसान झाल्याची घटना घडली असल्याने रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे लक्झरी बस चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोंढापुरी (ता. शिरुर) जवळ पुणे नगर महार्गावरुन एम एच १२ यु सि ३६८६ हि ईर्टीगा कार नगर बाजूने पुणेच्या दिशेने चाललेली असताना पाठीमागून आलेल्या एम एच १४ सि डब्ल्यू ४१५५ या लक्झरी बसची ईर्टीगा कारला जोरदार धडक बसून नंतर लक्झरी पुन्हा समोरील एम एच १९ सि एक्स ४८८४ या लक्झरी बसवर आदळून अपघात झाला, दरम्यान रस्त्यावर मोठी वाहतूक कोंडी झाली. घटनेची माहिती मिळताच रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे, पोलीस उपनिरीक्षक मारुती पासलकर, पोलीस हवालदार विलास आंबेकर, संतोष पवार, संदीप जगदाळे, महिला पोलीस हवालदार विद्या बनकर यांनी घटनास्थळी धाव घेतली तर नागरिकांनी जखमींना उपचारासाठी शिरुर व शिक्रापूर येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले, यावेळी मोठी वाहतूक कोंडी झाल्याने पोलिसांनी क्रेनच्या मदतीने रस्त्यावरील वाहने बाजूला करत वाहतूक कोंडी सुरळीत केली, सदर अपघातात शेरखान अजीज मुल्ला (वय ५२ वर्षे रा.चऱ्होली आळंदी रोड जि. पुणे) , सिद्धार्थ अशोक इंगळे (वय २९ वर्षे रा. शिरला अंधारे ता. पातुर जि. अकोला) , सौरभ रामचंद्र देशमुख (वय २७ वर्षे) , असिक असद शेख (वय ४० वर्षे) , चित्रा रमेश जोशी (वय ६५ वर्षे) , राज पंजाबराव सुरवारे (वय २७ वर्षे तिघे रा. खामगाव ता. खामगाव जि. बुलढाणा) , कैस्सार जुबेर शेख (वय ३२ वर्षे) , गुड्डू छेगझास (वय ३५ वर्षे) (दोघे रा. छत्रपती संभाजीनगर) , सचिन श्रीकिसन तायडे (वय ३२ वर्षे रा. मंगळूर नवघरे ता. चिखली जि. बुलढाणा) , बंडू जवाहर जगताप (वय ४९ वर्षे रा. चिंचवड जि. पुणे) , अमित वासुदेव सावंग (वय ४१ वर्षे) , अनिल वासुदेव सावंग (वय ४२ वर्षे) (दोघे रा. धामणा ता. अकोला जि. अकोला) , पृथ्वीराज राहुल इंगळे (वय २० वर्षे, रा. शेगाव ता. शेगाव जि. बुलढाणा) , प्राची केदार बर्वे (वय ३८ वर्षे रा. शिवाजीनगर पुणे) , संगीता शंकर माहुरे (वय ३७ वर्षे रा. हिंजवडी गावठाण ता. मुळशी जि. पुणे) , व काव्या सचिन विधाटे (वय १० वर्षे रा. बाणेर पुणे) हे प्रवासी गंभीर व किरकोळ स्वरुपात जखमी झाले असून सर्व प्रवाशांची रांजणगाव पोलिसांनी रुग्णालयात जाऊन चौकशी केली आहे,

तर घडलेल्या घटनेबाबत आशिष वसंतराव हिवराळे (वय ४१ वर्षे रा. अचलपूर ता. अमरावती जि. अमरावती) यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी एम एच १४ सि डब्ल्यू ४१५५ या लक्झरी बस वाहनावरील चालक सचिन श्रीकिसन तायडे (वय ३२ वर्षे रा. मंगळूर नवघरे ता. चिखली जि. बुलढाणा) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार संतोष पवार हे करत आहे.

# उद्योजकाला धमकावून ८५ हजार वसूल; एकाला अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**बारामती :** कटफळ (ता.बारामती) येथील अवजारे बनवणाऱ्या उद्योजकाकडून डॉन असल्याचे सांगून वारंवार धमक्या देत ८५ हजार रुपये वसूल केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नीरज रॉय याला बारामती तालुका पोलिसांनी अटक केली आहे. फिर्यादी हे बारामती एमआयडीसी मध्ये येथे अवजारे बनवणारी कंपनी चालवतात. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ऑक्टोबर २०२४ पासून निरज रॉय, शुभम मोरे व भूषण रणसिंगे या तिघांनी स्वतःला 'बारामतीचे डॉन' असल्याचे सांगत त्यांच्याकडून ऑनलाईन व रोख स्वरूपात वेळोवेळी पैसे घेतले. हे आरोपी तक्रारदार यांना बारामतीतील विविध हॉटेलमध्ये भेटून दारूचे बिल भरण्यास भाग पाडत होते.एप्रिल २०२५ पासून आरोपींनी 'तुला कंपनी चालवायची असेल तर महिन्याला पैसे द्यावे लागतील, नाहीतर तुला बारामतीत राहू देणार नाही' अशा धमक्या दिल्या. त्यानंतर कधी ४ हजार, कधी १० हजार रुपये अशा हप्त्यांमध्ये पैसे वसूल करण्यात आले. ऑक्टोबर २०२५ मध्ये पेन्सिल चौक येथे थांबवून 'दारूचे बिल भर नाहीतर हातपाय मोडीन' अशी धमकी देत फिर्यादीस मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. याच महिन्यात वंजारवाडीजवळ आरोपींनी त्यांच्याकडून २० हजार रुपये ऑनलाईन मागवले व धमकीखाली त्यांचा व्हिडिओ रेकॉर्ड केल्याचेही फिर्यादीने सांगितले आहे. पुढे १८ ऑक्टोबर रोजी रात्री अमरदीप हॉटेल येथेही आरोपींनी पुन्हा भेट देऊन १३ हजार रुपये मागितले व मारहाणीचा प्रयत्न केला.या सर्व कालावधीत आरोपींनी



एकूण ८५ हजार रुपयांहून अधिक रक्कम घेतली असून, 'आता पैसे दिले नाहीत तर जिवे मारू' अशी धमकी दिल्याचे अनिकेत मिंड यांनी तक्रारीत म्हटले आहे. बारामती तालुका पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी ही बाब गांभीर्याने घेत एकाला अटक केली आहे. न्यायालयाने आरोपीला तीन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. ही कारवाई पोलीस अधिक्षक संदीपसिंह गिल्ल पुणे ग्रामीण, अप्पर पोलीस अधिक्षक गणेश बिरादार, उपविभागीय अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. चंद्रशेखर यादव, पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील, पोलीस जवान राजेंद्र बन्ने, दादा दराडे, सुरेंद्र वाघ, भारत खारतोडे, संतोष कांबळे, निलेश वाकळे यांनी केली आहे.

# शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर द्यावा : उपमुख्यमंत्री अजित पवार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**बारामती:** राज्यातील शेतकऱ्यांच्या अंगी कुशलता असून ते अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतमालाच्या उत्पादनात वाढ करीत आहेत; अशा प्रगतशील तंत्रज्ञान आणि त्यामाध्यमातून कृषीक्षेत्रात होणाऱ्या बदलाविषयी इतर शेतकऱ्यांनीही माहिती घ्यावी, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. माळेगाव सहकारी साखर कारखाना येथे आयोजित कार्यक्रमात पवार यांच्या हस्ते कृषी यांत्रिकीकरण सन २०२५-२६ घटकाअंतर्गत निवड झालेल्या प्रातिनिधिक स्वरूपात ५१ लाभार्थ्यांना डि.बी.टी.डरे अनुदानावर ट्रॅक्टर व औजाराचे वितरण करण्यात आले. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे, उप विभागीय कृषी अधिकारी तुळशीराम चौधरी, माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या उपाध्यक्षा संगीता कोकरे, संचालक मंडळ, सभासद, विविध बँकेचे अधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पवार म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीमुळे (एआय) निर्णयप्रक्रिया डेटाआधारित असल्यामुळे अचूक होते, पिकातील दोष लवकर ओळखता येतात , त्यामुळे पिकाला लागणारे घटकांबाबत वेळेत माहिती मिळते. वीज आणि पाणी वापरात बचत होते, शेतमालाच्या उत्पादनातही वाढ होणार आहे, त्यामुळे वेगाने बदलणाऱ्या काळानुरुप शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला पाहिजे, याकरीता राज्य शासनाच्या वतीने सहकार्य करण्यात येईल. राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी राज्य शासनाने ३२ हजार कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. अजूनही राज्यातील विविध भागात पाऊस पडत असून अशा भागातील झालेल्या नुकसानाचे पंचनामे सुरु करण्यात आहे, त्यामुळे अशा शेतकऱ्यांनाही मदत करण्याकरिता अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढण्याकरिता कर्जमाफीच्या अनुषंगाने एक समिती गठीत केली आहे. या समितीने केलेल्या शिफारशीच्या आधारावर पुढची प्रक्रिया करून ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे.

# राष्ट्रीय एकता दिवस आय.एम.एस.सी.डी.आर येथे उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**अहिल्यानगर :**आय.एम.एस.सी.डी.आर अहमदनगर मध्ये ३१ऑक्टोबर रोजी भारताची एकता, सुरक्षितता आणि सुरक्षिततेसाठी राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. भारतीय प्रजासत्ताकाच्या संस्थापकांपैकी एक सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी केली जाते.

बी.पी. हिवाळे एज्युकेशन सोसायटी च्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (आय.एम.एस.) व्यवस्थापन शिक्षणात तीन दशकांहून अधिक काळ कार्यरत आहे. संस्थेला राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन मंडळ (एन.ए.ए.सी.), बंगलोरकडून पुनः मान्यता मिळाली आहे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 'सर्वोत्कृष्ट संस्था' पुरस्कार प्राप्त झाला आहे. कार्यक्रमाची सुरुवात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या छायाचित्राला पुष्पहार अर्पण करून झाली.. डॉ.एम.बी.मेहता यांनी उपस्थितांना संबोधित करून सांगितले कि, राष्ट्रीय एकता आणि दक्षता सप्ताहाच्या प्रतिज्ञेवरील मेळाव्याने, प्रत्येकाचा आदर करणे, भ्रष्टाचाराविरुद्ध उभे राहणे, विविधतेचा स्वीकार करणे, आपल्या कृतींसाठी जबाबदार असणे आणि दक्षतेला प्रोत्साहन देणे यांसारखे आवश्यक नियम लक्षात ठेवण्यासाठी जागरूक करते . ही तत्त्वे एकसंध, नैतिक आणि जागृत समुदायाला चालना देण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन प्रेरित करत राहतील.दिवंगत नेते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वात राष्ट्राची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्यासाठी समर्पणाची प्रतिज्ञा आणि एकीकरण आणि अंतर्गत सुरक्षेसाठी कठोर परिश्रम करण्याची तयारी ही विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्रशासकीय मंडळींनी घेतली. प्रतिज्ञांचे वाचन डॉ. हर्षवर्धन भावसार यांनी इंग्रजी भाषेत आणि डॉ. राहुल खंडेलवाल यांनी हिंदी भाषेत केले आणि उपस्थित प्रतिनिधींनी त्यांना प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे नेटक्या शैलीत सूत्रसंचालन प्रा. श्रुती राव यांनी केले. भारतीयत्वाची भावना दृढ करण्याच्या या प्रयत्नात मान्यवरांनी, विद्यार्थी आणि उपस्थितांनी मनःपूर्वक सहकार्य करून राष्ट्रीय एकात्मतेचा उज्ज्वल संदेश नव्या उंचीवर पोचवला. लायब्ररीने सरदार पटेल यांच्याशी संबंधित पुस्तक जॅकेट प्रदर्शन ठेवले विद्यार्थ्यांना त्यांच्या योगदानाची ओळख करून दिली.

# सामाजिक बांधिलकी जपत चौंडकर परिवाराच्या वतीने फिल्टर पाण्याची मोफत सेवा

**मयुर कुदळे । राष्ट्र सह्याद्री**
**जेजुरी :** सामाजिक बांधिलकी, लोकहित आणि मानवी संवेदनांचा सुंदर संगम दाखवणारा उपक्रम जेजुरीत सुरू झाला आहे. शहरातील युवा उद्योजक नवनाथ चौंडकर यांनी नागरिकांच्या मूलभूत गरजांचा विचार करून आई कै. रंजनाबाई बबन चौंडकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ फिल्टर पाण्याची मोफत सेवा या समाजोपयोगी योजनेची सुरुवात केली आहे.

जेजुरीतील विद्यानगर, ग्रीनपार्क, दवणे मळा रोड, साईनगर, महादेवनगर, दत्तनगर आणि भानगिरे प्लॉटिंग परिसरात दिवसाआड घरोघरी जाऊन मोफत पिण्याच्या पाण्याच्या जारचे वाटप या उपक्रमांतर्गत केले जात आहे. श्रीस्वामी समर्थ अक्वॉ या नावाने ही सेवा सुरू करण्यात आली असून, या भागातील रहिवाशांना मोफत शुद्ध, सुरक्षित पिण्याचे पाणी घरपोच उपलब्ध करून देण्याचा यामागील हेतू आहे. अलीकडच्या काळात जेजुरी शहरात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची कमतरता ही गंभीर समस्या बनली आहे. या पार्श्वभूमीवर चौंडकर यांनी समाजातील सर्व घटकांना मदत करण्याचा निर्णय घेतला. नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे आणि आरोग्य सुरक्षित राहावे, या उद्देशाने त्यांनी या सेवेची सुरुवात केली आहे.

चौंडकर यांनी सांगितले की, ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांत ही सेवा सुरू राहील. तसेच येत्या आणि यापुढील प्रत्येक उन्हाळ्यातील एप्रिल आणि मे महिन्यांत फिल्टर केलेले थंड पाणी



मोफत घरोघरी वाटप केले जाईल. ते म्हणाले, उन्हाळ्याच्या प्रखर तापात अनेकांना थंड पिण्याच्या पाण्याची गैरसोय भासते. अशा वेळी नागरिकांना दिलासा देणे, हेच आमचे कर्तव्य आहे. या जनोपयोगी उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. अनेक रहिवासी आणि स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी चौंडकर यांचे कौतुक करत हे काम म्हणजे खऱ्या अर्थाने जनसेवा आहे अशी प्रतिक्रिया दिली आहे.

विशेषतः वृद्ध, विद्यार्थी आणि कामगार वर्गासाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरत आहे. यावेळी उद्घाटन प्रसंगी भाजपा जेजुरी शहराध्यक्ष सचिन पेशवे, सचिनशेठ सोनवणे,हरीभाऊ पवार, गणेश भोसले,अजिंक्य देशमुख, अनिकेत हरपळे, रवींद्र खोमणे, संदीप अप्पा जगताप, चंद्रकांत जगताप, सागर शिंदे, वैभव झगडे, रामा दवणे, सनी झगडे, सुनील वाघ , देविदास पोंदकुले , प्रशांत सरोदे यांसह स्थानिक रहिवाशी, सामाजिक कार्यकर्ते आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमातून नवनाथ चौंडकर यांनी सामाजिक जबाबदारीची नवी दिशा दाखवली आहे. आजच्या काळात जिथे पिण्याच्या पाण्याचे दर दिवसेंदिवस वाढत आहेत, तिथे मोफत आणि स्वच्छ पाणी नागरिकांना उपलब्ध करून देणे ही मोठी सामाजिक सेवा ठरते.थंड पाण्याचा गारवा आणि मानवी ममतेचा उबदारपणा ` या दुहेरी अर्थाने चौंडकर यांची मोफत फिल्टर पाणी वाटप सेवा जेजुरीत सकारात्मक बदल घडवते आहे. त्यांच्या पुढाकारामुळे शहरात सामाजिक ऐक्य, परस्पर सहाय्य आणि माणुसकीची भावना अधिक दृढ होत आहे.

नवनाथ चौंडकर यांनी दाखवून दिले आहे की, समाजासाठी काहीतरी करायची इच्छा आणि कृतीशीलता असेल, तर मोठा बदल घडवता येतो. हा केवळ पाणीपुरवठा उपक्रम नाही, तर जनसेवेचा, माणुसकीचा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा जिवंत संदेश आहे.

## सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त 'एकता दौड' उत्साहात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**आळंदी :** आपल्या देशाची अखंडता, एकात्मता आणि राष्ट्रभावनेचे प्रतीक असलेल्या लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आळंदीत रन फॉर युनिटी या एकता दौडीचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. ही दौड पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत आळंदी पोलीस स्टेशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी.एस.नरके म्हणाले, देशाची एकात्मता, सामाजिक बांधिलकी आणि देशप्रेम यांचा संदेश देणारी ही एकता दौड हे एक प्रेरणादायी उदाहरण आहे. युवकांनी एकजुटीने देशाच्या प्रगतीसाठी काम करावे.

एकता दौड चाकण चौक, प्रदक्षिणा मार्ग, जुना पूल, वाय जंक्शन, नवीन पूल, ज्ञानेश्वर विद्यालय या मार्गाने पार पडली. नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून उत्स्फूर्त स्वागत केले. या उपक्रमात डॉक्टर असोसिएशन, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान, संघर्ष प्रतिष्ठान, श्री ज्ञानेश्वर विद्यालय, ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम, ज्ञानसाई विद्यालय तसेच पंचक्रोशीतील विविध शाळांचे विद्यार्थी, सेवाभावी संस्था, तरुण मंडळे आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. या वेळी श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर, प्राचार्य सूर्यकांत मुंगसे, डॉ. विकास पाटील, डॉ.सारंग जोशी यांसह पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

# कर्तव्यदक्ष, जनतेचा विश्वासू आणि लोकप्रिय युवा नेता : मा. श्री. अविनाश आदिक साहेब !

राजकारण, समाजकारण, शिक्षण आणि संस्कृती या सर्व क्षेत्रात ठसा उमटवणारे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा राष्ट्रीय प्रवक्ते मा. श्री. अविनाश (दादा) आदिक साहेब यांचा वाढदिवस १ नोव्हेंबर रोजी उत्साहात साजरा होत आहे.

कर्तव्यदक्ष, संवेदनशील आणि कार्यकर्त्यांचा आधारस्तंभ म्हणून ओळखले जाणारे हे युवा नेतृत्व आज महाराष्ट्राच्या राजकीय आकाशातील तेजस्वी तारा ठरले आहे.

महान परंपरेचा वारसा – नवे युग घडवणारे नेतृत्व माजी उपमुख्यमंत्री बॅरिस्टर रामराव आदिक साहेब आणि माजी खासदार गोविंदरावजी आदिक साहेब यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा लाभलेले अविनाश दादा आदिक यांनी समाजकारण, शिक्षण आणि कामगार कल्याण या क्षेत्रात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. कोकण विद्यापीठाचे सुवर्णपदक विजेते असलेले अविनाश दादा शिक्षण, कृषी आणि सामाजिक उपक्रमांमधून नेहमी पुढे राहिले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचा दमदार प्रवक्ता – संघटन कौशल्याचा ठसा मुंबई प्रदेश सरचिटणीस या पदावरून सुरुवात करत आज ते राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून राज्यात पक्षाची भूमिका प्रभावीपणे निभावत आहेत. २०१६ मधील श्रीरामपूर नगरपरिषद निवडणुकीत प्रथमच लोकनियुक्त नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक यांना निवडून आणण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. राज्यभरातील हल्लाबोल आंदोलनांमध्ये त्यांनी घेतलेला सक्रीय सहभाग आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवीन जोश निर्माण झाला.

कामगार, शेतकरी व सर्वसामान्य जनतेचा आवाज महाराष्ट्र राज्य कामगार फेडरेशनचे अध्यक्ष म्हणून अविनाश दादा यांनी साखर उद्योगातील कामगार, ऊस तोडणी मजूर आणि शेतकरी यांच्या हक्कांसाठी नेहमीच शासन दरबारी आवाज उठवला. कामगारांच्या



श्रमाला न्याय्य मोल मिळवून देणे हीच खरी सेवा ` या विचारावर त्यांचा ठाम विश्वास आहे.

शैक्षणिक आणि सामाजिक कार्यात अग्रेसर १९७५ मध्ये स्थापन झालेल्या शैक्षणिक संकुलाचे सचिव म्हणून त्यांनी गरीब, निराधार आणि विशेष मुलांच्या शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्न केले. साखर कामगार हॉस्पिटलमध्ये आरोग्य शिबिरे, मोफत तपासणी व उपचार, तसेच जनजागृती अभियान अशा उपक्रमांडरे त्यांनी समाजमनात विशेष स्थान मिळवले आहे.

भाषिक प्रभुत्व आणि प्रभावी वक्तृत्व शैली मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांवरील प्रभुत्वामुळे अविनाश आदिक पक्षाचे प्रभावी प्रवक्ते म्हणून ओळखले जातात. आयबीएन लोकमत, झी २४ तास, आजतक आदी वृत्तवाहिन्यांवरील त्यांची मांडणी नेहमी ठाम, विचारप्रधान आणि तडफदार असते.

कला, संस्कृती व क्रीडाक्षेत्राशी जिव्हाळा साहित्य, संगीत, चित्रपट आणि क्रीडा क्षेत्राशी आपुलकी राखणारे अविनाश दादा हे रसिक आणि संवेदनशील नेतृत्व म्हणून प्रसिद्ध आहेत. संवेदनशीलता, वाचन, वक्तृत्व आणि कृतीशीलता या गुणांनी त्यांनी समाजाच्या प्रत्येक घटकात विश्वास निर्माण केला आहे.

विचारांनी समृद्ध – कार्यकर्त्यांचा खरा मार्गदर्शक सातत्य, कर्तव्यनिष्ठा आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी झटणारे अविनाश आदिक हे आजच्या नव्या पिढीतील प्रेरणास्थान ठरले आहेत.

**कवयित्री संगीता फासाटे कटारे**
**इंदिरानगर ९५ १८ ९० ०५१८**

द•ख•ल

## मनपाच्या आवारात डॉ. आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा बसवा; आयुक्तांना निवेदन

**अहिल्यानगर :** येथील महानगरपालिकेच्या आवारात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा लवकरात लवकर बसविण्यात यावा, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसून त्या चौकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या नावाचे फलक मनपाच्या वतीने बसवण्यात यावेत, तसेच पूर्ण कृती पुतळ्याच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पायापाशी जाण्याकरता पायर्या बसवण्यात यावे तसेच शुशोभिकरणातील लॉन खराब झालेले असल्याने लॉनचे काम नव्याने करण्यात यावे व सुरक्षिततेच्या तसेच स्वच्छतेच्या



दृष्टिकोनातून २४ तास महापालिकेच्या कर्मचारी वर्ग नेमण्यात यावा अशी मागणी समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात सकल आंबेडकरी समाजाच्या वतीने मनपा आयुक्तांना निवेदन देऊन या मागण्या तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी सुरेश बनसोडे, सुमेध गायकवाड, किरण दाभाडे, विशाल भिंगारदिवे, किरण गायकवाड, संतोष पाडळे, रवींद्र कांबळे, संजय खामकर, मयूर बांगरे, सुभाष वाघमारे, अजय पाखरे, अंकुश मोहिते, कौशल गायकवाड, सचिन जगधने, येशुदास वाघमारे, रवींद्र कांबळे, सिद्धांत गायकवाड, अंबादास अरुण, आदेश बचाटे, सुरेश वैरागर, सतीश साळवे, समीर भिंगारदिवे, पप्पू पाटील, वैभव आवटी, ऋषी कसबे, सागर ठोकळ, सचिन शेलार, नितीन खंदारे, संजय खामकर, अरुण गाडेकर, अशोक नन्नवरे, युवराज शिंदे, विवेक विधाते, सुमित भिंगारदिवे, महेश सातपुते, राजू पाटोळे, राहुल शिवशरण, दीपक सरोदे आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. मार्केट यार्ड चौकाला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असे नाव देण्यात आले आहे. परंतु त्या चौकात संबंधित नावाचे ॲक्रीलिक फलक अद्याप बसविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे ते फलक त्वरित लावण्यात यावेत, अशीही मागणी करण्यात आली.आंबेडकरी समाजाचे पदाधिकारी, भीमसैनिक आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी या निवेदनावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## शिवसेना शिंदे गट व राष्ट्रीय श्रीराम संघाचा दीपावली फराळ उत्साहात

**श्रीरामपूर :** शहरातील व तालुक्यातील शिंदे शिवसेना गटाचे शिवसैनिक तालुका प्रमुख,शहर प्रमुखां बरोबरच जिल्हा प्रमुख नितीन औताडे व राष्ट्रीय श्रीराम संघांचे कार्यकर्ते पदाधिकारी यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला स्नेह कार्यक्रमाचे स्वरूप आले होते. राष्ट्रीय श्रीराम संघांचे खंदे समर्थक व शिरसगावचे युवा नेतृत्व रोहित दिनकर यादव यांना शिंदे शिवसेनेच्या श्रीरामपूर तालुका युवा सेनेच्या अध्यक्षपदाचे नियुक्त पत्र प्रशांत सदाशिव लोखंडे यांच्या हस्ते देण्यात



आले.एक दिवस अगोदर या कार्यक्रमाचे झालेले नियोजन आणि दिलेल्या निरोपावर शहरातील व तालुक्यातील असंख्य नागरिकांनी कार्यक्रमाला हजेरी लावली. उत्तर नगर जिल्हा माजी प्रमुख राजेंद्र देवकर यानी धर्मरक्षक सागर बेग यांनीच नगराध्यक्ष पदाची उमेदवारी करण्याचा शिंदे शिवसेनेची ईच्छा असल्याचे मत व्यक्त करत जिल्ह्यात धनुष्य बाण पेलण्याची ताकद फक्त सागर बेग यांच्यातच असल्याचे विचार मांडले.

या कार्यक्रमासाठी जिल्हा प्रमुख उत्तर नगर नितीन औताडे, माजी जिल्हा प्रमुख उत्तर नगर जिल्हा राजेंद्र देवकर.युवा सेना जिल्हा प्रमुख शुभम वाघ,जिल्हा प्रमुख जइउ तगछढ सारिकाताई राजेश वाव्हळ,शहर प्रमुख महिला आघाडी . सुरेखाताई वाडिले,जिल्हा उप प्रमुख महिला आघाडी राजश्री होवाळ,तालुका प्रमुख संतोष डहाळे, तालुका प्रमुख प्रदीप वाघ,माजी तालुकाप्रमुख बापू शेरकर,विशाल शिरसाठ जिल्हा प्रमुख बांधकाम कामगार,संजय बाहुले जिल्हा उप प्रमुख जइउ वजन्ट,शिवनाथ फोपसे उप तालुका प्रमुख विशाल दुर्गे,विठ्ठल गोराणे,सागर कुदळे,महादेव होवाळ, संदीप दातीर (युवासेना तालुका प्रमुख) लक्ष्मण पाचपिंड यांसह असंख्य पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ३५५० रु. दर द्या नाहीतर जिल्हाधिकारी कार्यालयावर मुक्काम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या खाजगी व सहकारी साखर कारखान्यांना शिवसेना (शिंदे गट) चे नेते अभिजीत पोटे यांनी थेट इशारा दिला आहे. केंद्र शासनाने सुचवलेला प्रति टन ३५५० रुपयांचा ऊसदर लागू न केल्यास आणि थकीत बिले न दिल्यास १७ नोव्हेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयावर मुक्काम आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. ३१ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात झालेल्या बैठकीत खाजगी व सहकारी साखर कारखान्यांचे प्रतिनिधी, शेतकरी प्रतिनिधी व अन्यायग्रस्त शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांनी या वेळी उस दर न जाहीर करणे, वजन काट्यातील फसवणूक, वाहतूक व्यवस्थेतील गैरप्रकार आणि धोकादायक ऊस वाहतूक याबाबत तीव्र संताप व्यक्त केला. बैठकीत स्पष्ट झाले की जिल्ह्यातील बहुतेक साखर कारखाने केंद्र सरकारच्या निर्देशानुसार दर लागू करण्यास टाळाटाळ करत आहेत. अनेक कारखान्यांचे चेअरमन किंवा व्यवस्थापकीय संचालक बैठकीस अनुपस्थित राहून कनिष्ठ कर्मचाऱ्यांना पाठवतात, यावर शेतकरी प्रतिनिधींनी संताप व्यक्त केला. कारखान्यांकडून बाहेरील काट्यावर वजनास मनाई, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर फसवणूक. जिल्ह्याबाहेरील ऊस आणण्याचा वाहतूक खर्च स्थानिक शेतकऱ्यांवर



टाकण्याची प्रवृत्ती. ऋछझ नुसार देयके न दिल्यासही कारवाईचा अभाव. ऊस नियंत्रण आदेश १९६६ नुसार १५ दिवसांत पैसे देणे बंधनकारक असतानाही दुर्लक्ष. कुकडी कारखान्याची दिशाभूल: कुकडी

**अभिजीत पोटे यांचा इशारा**

साखर कारखान्याने प्रति टन २९११ रुपये दर दाखवून शेतकऱ्यांची दिशाभूल केली. याबाबत शेतकऱ्यांनी साखर आयुक्तांकडे तक्रार दिली असली तरी अद्याप कोणताही खुलासा झालेला नाही.धोकादायक ऊस वाहतूक: ओव्हरलोड आणि मॉडिफाइड वाहने रस्त्यावर धावत असल्याने दरवर्षी शेकडो अपघात होत असून परिवहन आणि पोलिस विभाग अपयशी ठरल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. तसेच ठेकेदारांकडून प्रति एकर १० ते १५ हजार रुपये अवैध शुल्क आकारले जात असल्याची तक्रार करण्यात आली. जर १६ नोव्हेंबरपर्यंत सर्व साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांची थकीत बिले व्याजासह जमा केली नाहीत आणि केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ३५५० रुपये दर जाहीर केला नाही, तर १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता हजारो शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयावर मुक्काम आंदोलन करतील, असा इशारा पोटे यांनी दिला. या बैठकीस कुकडी साखर कारखान्याचे थकीत पेमेंट असलेले शेतकरी तसेच शिवसैनिक कृष्णा सातपुते, संजय वाघ, महादेवजी आव्हाड, बाळासाहेब कदम, सोमनाथ गरजे, बाळासाहेब कराळे, प्रशांत कराळे, शरद वाळुंज, युसुफ पठाण, बाळासाहेब पेरणे, रोहन साळवे, सचिन तांबे, चावरे आदी उपस्थित होते.

# मोबाईलचा अतिवापर आरोग्यास हानिकारक

## विद्यार्थी मोबाईलच्या आहारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर:** मोबाईल हा आज प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला आहे. लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वजण दिवसभर मोबाईलचा वापर करताना दिसतात. दिवाळीच्या सुट्टीत शाळा आणि महाविद्यालये बंद असल्याने विद्यार्थ्यांकडे भरपूर मोकळा वेळ आहे. मात्र, हा वेळ अभ्यासाऐवजी अनेक विद्यार्थी मोबाईलमध्येच घालवत आहेत. रात्रभर मोबाईल वापरण्याची सवय वाढत असून त्यामुळे डोळ्यांवर, मेंदूवर आणि झोपेवर गंभीर परिणाम होत आहेत. सतत स्क्रीनकडे पाहिल्यामुळे डोळ्यांची झीज होते, लक्ष केंद्रीत होण्याची क्षमता कमी होते आणि झोपेची गुणवत्ता खालावते. रिल्स, गेम्स आणि नोटिफिकेशनच्या आकर्षणामुळे वेळ कसा निघून जातो हे कळत नाही. मोबाईल वापरण्याच्या या सवयीमुळे मानसिक आरोग्यही बिघडते. म्हणूनच मोबाईलवरील नोटिफिकेशन्स बंद ठेवावेत आणि अनावश्यक ॲप्स काढून टाकावीत, असा सल्ला तज्ज्ञ देतात. रात्री झोपण्यापूर्वी मोबाईलऐवजी एखादे पुस्तक वाचल्यास झोप उत्तम लागते आणि मन-शरीर दोन्ही ताजेतवाने राहते.

**मोबाईलचे तोटे !**

मोबाईलच्या स्क्रीनमधून निघणारा निळा प्रकाश डोळ्यांसाठी अत्यंत हानिकारक असतो. सतत मोबाईल वापरल्याने झोपेचा चक्र बिघडते आणि निद्रानाशाचा त्रास होतो. दीर्घकाळ स्क्रोलिंगमुळे मानसिक अस्वस्थता व नैराश्याची लक्षणे दिसू लागतात.

**क्रोलिंगची सवय कशी थांबवावी ?**

मोबाईल वापरण्याची दैनिक वेळ निश्चित करा आणि तिचे पालन करा. रात्री एका ठराविक वेळेनंतर इंटरनेट बंद करा. स्वतःवर नियंत्रण ठेवा ˆ काही दिवसांतच फरक जाणवेल

# मनपाचे स्वच्छता अभियान सुरू आमदार संग्राम जगताप यांची पाहणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहर स्वच्छ आणि आकर्षक ठेवण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने मोठ्या प्रमाणावर स्वच्छता अभियानास सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमाची पाहणी आमदार संग्राम जगताप यांनी स्वतः प्रत्यक्ष उपस्थित राहून केली. त्यांनी भगतसिंग उद्यान, माळीवाडा रस्ता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, तसेच सक्कर चौक काँक्रिटीकरण रस्ता आदी ठिकाणांची पाहणी करत स्वच्छतेचा आढावा घेतला.या मोहिमेद्वरे शहरातील मुख्य रस्त्यांवरील साचलेली माती, दुभाजकाजवळील कचरा, तसेच नाल्यांमधील गाळ हटविण्याचे काम सुरू असून, यासाठी मनपाने कॉम्पॅक्टर वाहनांचा वापर केला आहे. शहरातील स्वच्छतेबाबत नागरिकांच्या सहकार्याचे महत्त्व अधोरेखित करत आमदार जगताप म्हणाले, ज्या पद्धतीने नागरिक आपले घर स्वच्छ ठेवतात, त्याच पद्धतीने आपला परिसर आणि शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाने घेतली पाहिजे. घंटागाडीतच कचरा द्यावा, रस्त्यावर टाकू नये. काही नागरिकांच्या निष्काळजीपणामुळे नाले बंद होतात आणि रस्त्यांवर कचरा साचतो. मनपाच्या प्रयत्नांना नागरिकांचे सहकार्य आवश्यक आहे. विशेष म्हणजे, दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेले पत्रकार चौकातील भगतसिंग उद्यान आता नव्या रूपात झळकू लागले आहे. उद्यान परिसरातील माती, कचऱ्याचे ढिगारे, तसेच गवताची स्वच्छता मनपाच्या कर्मचाऱ्यांनी करून घेतली. यामुळे परिसर पुन्हा एकदा ताजेतवाने झाला आहे.

महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, शहरात दररोज दोन वेळा स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे ˆ सकाळी ६ ते १० आणि दुपारी २ ते ६ या वेळेत. घनकचरा विभागाच्या माध्यमातून रस्त्यांवरील माती, कचरा, दुभाजकाजवळील साचलेली माती यांची नियमित साफसफाई करण्यात येणार आहे.

आयुक्त डांगे पुढे म्हणाले, कॉम्पॅक्टर मशीनद्वरे आधुनिक पद्धतीने स्वच्छता सुरू करण्यात आली असून, त्यामुळे कचऱ्याचे संकलन आणि व्यवस्थापन अधिक परिणामकारक पद्धतीने होणार आहे. नागरिकांनी आपल्या घरातील कचरा वेळेवर घंटागाडीत द्यावा आणि शहराच्या स्वच्छतेत सक्रिय सहभाग घ्यावा.

या अभियानामुळे अहिल्यानगर शहरातील स्वच्छतेबाबत एक सकारात्मक पाऊल उचलले गेले असून, नागरिकांकडून या उपक्रमाचे स्वागत होत आहे. काही स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक रहिवाशांनीही या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

मनपाच्या या उपक्रमामुळे शहराचे रूपडे बदलण्यास हातभार लागेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# समर्थ क्रॉपकडून कोट्यवधींची फसवणूक

## आरोपींवर लुकआउट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** उच्च परतावा आणि नफा देण्याचे आमिष दाखवून समर्थ क्रॉप कंपनीने श्रीगोंदा तालुक्यासह राज्यातील विविध भागांतील शेतकऱ्यांची कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष संभाजी झरे यांनी कंपनीच्या संचालकांवर तात्काळ अटक व लुकआउट नोटीस जारी करण्याची मागणी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रशांत अनिल गवळी (रा. हडपसर, पुणे) यांनी समर्थ क्रॉप नावाने कंपनी स्थापन केली होती. या कंपनीतून शेतकऱ्यांना शेतीसंबंधी गुंतवणूक करून मोठा नफा मिळवून देण्याचे आश्वासन दिले गेले. त्यावर विश्वास ठेवून अनेक शेतकऱ्यांनी लाखो रुपयांची गुंतवणूक केली. मात्र अलीकडेच कंपनीचे कार्यालय बंद झाले असून, संचालक प्रशांत गवळी आणि त्यांचे सहकारी ठिकाण अज्ञात करून फरार झाले आहेत. शेतकऱ्यांनी आपले पैसे परत मागितले असता कंपनीचे सर्व मोबाईल क्रमांक व संपर्क साधने बंद करण्यात आली आहेत. हडपसर येथील कार्यालयही शटरबंद अवस्थेत आढळले. त्यामुळे शेतकरी आर्थिक व मानसिकदृष्ट्या उद्धस्त झाले असून, संताप व्यक्त करत आहेत. दरम्यान, आरोपींनी देश सोडून पळून जाण्याची शक्यता निर्माण झाली असून, परिसरात याबाबत तीव्र चर्चा सुरू आहे. पीडित शेतकऱ्यांकडे आर्थिक व्यवहारांचे सर्व पुरावे व दस्तऐवज उपलब्ध असून त्यांनी हडपसर पोलीस ठाणे तसेच पोलीस उपआयुक्त कार्यालयात गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केला. मात्र स्थानिक पोलिसांकडून गुन्हा नोंदविण्यास टाळाटाळ केली .

या पार्श्वभूमीवर, संभाजी ब्रिगेड व पीडित शेतकऱ्यांनी पुणे येथील आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस आयुक्त यांना निवेदन देऊन खालील महत्वाच्या मागण्या केल्या आहेत ˆ समर्थ क्रॉप कंपनी व सर्व संचालकांवर फसवणुकीचा गुन्हा तात्काळ दाखल करून अटक करण्यात यावी. सर्व संचालकांच्या बँक खात्यांची, मालमत्तेची आणि आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्यात यावी. आरोपींचे सीडीआर व एचडीआर रिपोर्ट तपासून इतर सहभागींचा सहभाग शोधण्यात यावा. आरोपींच्या पासपोर्टवर निर्बंध घालून देशाबाहेर पलायन रोखण्यात यावे.देशाबाहेर पळून जाण्याची शक्यता लक्षात घेता तात्काळ लुकआउट नोटीस जारी करण्यात यावी.

# भागवत ग्रंथातून मानवी जीवन मूल्यांची शिकवण मिळते : दिनकर महाराज अंचवले



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** मानवी जीवन मूल्यांची शिकवण देणारा पवित्र ग्रंथ म्हणजे भागवत. सामाजिक राजकीय आणि कौटुंबिक समस्यांचे निराकरण करणारे श्रीकृष्ण चरित्र नव्या पिढीने आत्मसात करावे. असे प्रतिपादन श्रीमद भागवत कथेचे गाढे अभ्यासक दिनकर महाराज अंचवले यांनी केले . तालुक्यातील आदर्श गाव वाघोली येथे वेदमूर्ती ह.भ.प. विष्णुपंत भालेराव यांच्या मातोश्री वै. ह.भ.प. रुक्मिणी भालेराव यांच्या पुण्यस्मरणानिमित्त गुरुवार दि . ३० पासून ५ नोव्हेबर पर्यंत धाकटी पंढरी म्हणून ख्याती असलेल्या श्री क्षेत्र वरुरच्या श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थानचे महंत, ज्येष्ठ भागवताचार्य दिनकर महाराज अचवले यांच्या सुश्राव्य श्रीमद भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी (दि ३० ) सायंकाळी श्रीमद भागवत कथा प्रारंभ झाला . यावेळी ते निरुपण करत होते . कथा व्यास दिनकर महाराज यांचा पाच दशकाहून अधिक काळ असा श्रीमद् भागवत कथेचा प्रदीर्घ गाढा अनुभव आणि.गायनाचार्य आणा महाराज वावरे मृदंगा चार्य माणिक महाराज वावरे यांची उत्तम साथ म्हणजे दुग्ध शर्करा योग आहे . यावेळी अभिमन्यू महाराज भालसिंग, श्री रेणुका मल्टीस्टेट संस्थेचे प्रवर्तक जेष्ठ अर्थतज्ञ डॉक्टर प्रशांत नाना भालेराव, विष्णुपंत भालेराव, उद्धव वाघ, शिवरांकर शिंदे, भाऊसाहेब शेळके,मंगल ताई भालेराव,जयंती भालेराव,रेखा भालेराव,बेबी शहापूरकर, राधिका वरघडे, प्रतीक भालेराव, आबासाहेब पाटील,अनिकेत गायकवाड आदि भविकांची उपस्थिती होती . याप्रसंगी अंचवले महाराज म्हणाले ., श्रीमद् भागवत कथा मानवी जीवनाच्या कल्याणासाठी दिशादर्शक आहे . भगवत प्राप्ती निष्काम भक्ती आणि कर्तृत्व शक्तीची जाणीव करून देणारे श्रीकृष्ण चरित्र हे विश्वासाठी प्रेरणास्थान आहे. ते मनाचे कान करून शांत चित्ताने श्रवण करणाऱ्या प्रत्येक भाविकाला सुख समाधानाची अनुभूती प्राप्त होते

# मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी घेतली कर्डीले कुटुंबीयांची सांत्वनपर भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी बुऱ्हाणनगर येथे स्व. आमदार शिवाजी कर्डीले यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. श्री भोसले यांनी स्व. कर्डिले यांचे सुपुत्र अक्षय कर्डिले आणि कुटुंबातील इतर सदस्यांना धीर देत, स्व. शिवाजी कर्डिले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. मंत्री भोसले यांनी या प्रसंगी बोलताना सांगितले, स्व. शिवाजी कर्डीले हे अत्यंत मनमिळावू आणि जनतेसाठी झटणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी संघर्षातून सरपंच पदापासून ते आमदार पदापर्यंतचा प्रवास केला. त्यांच्या अचानक निधनाने जिल्ह्याला भरून न निघणारी हानी झाली आहे. या दु:खातून कर्डीले कुटुंबीयांना धीर देण्याची शक्ती परमेश्वराने देईल, अशी प्रार्थना त्यांनीकेली. स्व. कर्डीले यांच्या कार्याची आठवण त्यांच्या शेजारी, मित्रपरिवार आणि सहकाऱ्यांमध्ये आजही ताजी आहे. त्यांच्या समाजसेवेतील योगदानाचे आणि जनतेसाठी केलेल्या संघर्षाचे स्मरण करत मंत्री भोसले यांनी कुटुंबीयांना सांत्वन केले, . या भेटीत स्थानिक नेते, परिवाराचे सदस्य आणि कर्डीले यांच्या सहकाऱ्यांची उपस्थिती होती.



# "श्री रेणुका मल्टीस्टेट" सेवक केंद्रित व सामाजिक उत्तरदायित्व जपणारी संस्था: डॉ. भालेराव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव:** संस्थेत कार्यरत असताना आपण संस्थेसाठी काम करतो ही भावना न ठेवता आपल्यासाठीच काम करतो या भावनेने,आपुलकीने काम करावे म्हणजे संस्था व सेवक यांच्यात कधीच दुरावा राहणार नाही .असा आपुलकीचा सल्ला देऊन आपली श्री रेणुका माता मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह अर्बन क्रेडिट सोसायटी ही संस्था आपल्या सेवकांना अन्य कोणत्याही संस्थे पेक्षा कितीतरी अधिक व शासकीय कर्मचाऱ्या प्रमाणेच सर्व प्रकारच्या सेवा सुविधा देत असल्याची माहिती संस्थेचे प्रवर्तक तथा ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉक्टर प्रशांत नाना भालेराव यांनी दिली . श्री क्षेत्र अमरापूरच्या श्री रेणुका माता देवस्थान भक्तनिवासाच्या सभागृहात श्री रेणुका माता मल्टी स्टेट संस्थेच्या राज्यातील उत्तर भागातील काही शाखाच्या कर्मचाऱ्याच्या आयोजित स्नेह मेळावा तथा आढावा बैठकीत ते बोलत होते

यावेळी अर्थतज्ञ डॉक्टर भालेराव म्हणाले, श्री रेणुका माता मल्टीस्टेट संस्थेमध्ये कायम झालेल्या सेवकांसाठी शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे पीएफ सेवा निवृत्ती वेतन तसेच अन्य सर्व सेवा सुविधा लागू करण्यात आल्या आहेत. नुकत्याच निवृत्त झालेल्या दोघा सेवकांना प्रत्येकी २० लाख रुपये ग्रॅज्युटी व साडेसात हजार सेवानिवृत्ती वेतन (पेन्शन ) मंजूर झाले आहे .

तसेच अशा सेवा निवृत्त कर्मचाऱ्याच्या निधनानंतर त्याच्या वारस पत्नीस तीन हजार रुपये तर दोन आपत्यास त्यांच्या वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत प्रत्येकी साडेसातशे रुपये दिले जातात. गरोदर महिलेस सहा महिने हक्काची पगारी सुट्टी दिली जाते . संस्थेतील कायम कर्मचाऱ्यांचा विमा उतरविला जातो . आजारपणात एक कोटी रुपयापर्यंत आरोग्य विम्याचा लाभ दिला जातो. त्यात कर्मचारी स्वतः, त्याची पत्नी, मुले व आई-वडिलांच्या आजारपणात या विम्याचा हातभार लागू शकतो . याशिवाय सेवकांच्या आपत्यांच्या कोणत्याही उच्च शिक्षणासाठी जेवढी फी असेल तेवढी देऊन श्री रेणुका माता मल्टिस्टेट संस्था आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी देखील मोठा हातभार लावते . चालू आर्थिक वर्षात ५० पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांच्या अपत्यांचे ६० लाख रुपये शैक्षणिक शुल्क संस्थेने भरले आहे . डॉ. भालेराव पुढे म्हणाले, सेवक करत असलेल्या काम काजाचे मुल्यमापन करून त्यास प्रोत्साहन दिले जाते . चांगल्या कार्यास गुण दिले जातात . त्यानुसार त्याचे खाती इन्सेन्टीव्ह जमा देऊन त्याचे पाठीवर कौतुकाची थाप दिली जाते . आपल्या नियमीत वेतना व्यतिरिक्त दरमहा लाखापर्यंत इन्सेन्टीव्ह घेणारे अनेक सेवक संस्थेत आहेत ! याशिवाय सेवकांना दर वर्षी ५१ लाख रुपयाची रोख पारितोषिकेही मान्यवरांच्या हस्ते वितरीत केली जातात .चालूवर्षी प्रसिद्ध सिने अभिनेत्री वर्षा उसगावकर यांचे हस्ते ५ १ लाखाची पारितोषिके वितरीत करून सेवकांचा गौरव करण्यात आला आहे

# अक्षय कर्डिले यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा, हीच खरी श्रद्धांजली: कोतकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** भाजप नेते, जिल्हा बँकेचे अध्यक्ष आणि नगर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे मार्गदर्शक आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या आकस्मिक निधनाने तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या स्मरणार्थ मा. खा. दादापाटील शेळके कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे शोकसभेचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी बाजार समितीचे माजी सभापती भानुदास कोतकर यांनी आमदार कर्डिले यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, बाजार समितीचा कारभार आमदार कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली सुसूत्रपणे सुरु होता. त्यांच्या मार्गदर्शनाखाली चिचोंडी पाटील येथे उपबाजाराचे काम सुरु झाले. शेतकरीहितासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. त्यांच्या निधनाने सर्वांना मोठा धक्का बसला आहे. आता त्यांच्या पश्चात समितीचा कारभार युवा नेते अक्षय कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली चालणार आहे. सर्वांनी त्यांच्याभोवती एकजुटीने उभे राहणे, हीच खरी आमदार शिवाजीराव कर्डिले यांना श्रद्धांजली ठरेल. शोकसभेस सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सूळ, संचालक संतोष म्हस्के, हरिभाऊ कर्डिले, सुधीर भापकर, संजय गिरवले, मधुकर मगर, दत्तात्रय तापकिरे, भाऊ भोर, राजू आंबेकर, सुभाष निमसे, धर्मनाथ आव्हाड, राजेंद्र बोथरा, मंजाबापू घोरपडे, रामदास सोनवणे,



निलेश सातपुते, भाऊसाहेब ठोंबे, तसेच भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, सचिव अभय भिसे, सहसचिव सचिन सातपुते, बाळासाहेब लबडे, आणि कार्यकर्ते, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी संचालकांनी आमदार कर्डिले यांच्या आठवणींना उजाळा दिला. गेल्या दहा-पंधरा वर्षांपासून त्यांनी बाजार समितीचा कारभार शिस्तबद्धपणे चालवला. बाजार समितीला राज्यात नावलौकिक मिळवून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. नगर-राहुरी-पाथर्डे मतदारसंघाच्या विकासासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. सभेच्या शेवटी दोन मिनिटे मौन पाळून स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# आज आ. संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत डेंगीमुक्त अहिल्यानगर अभियानाचा समारोप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरात गेल्या काही महिन्यांपासून राबविण्यात आलेल्या 'डेंगीमुक्त अहिल्यानगर' या अभियानाचा समारोप शनिवारी (ता. १) होत आहे. न्यू आर्ट्स महाविद्यालयात सकाळी आठ वाजता आमदार संग्राम जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली. महानगरपालिका प्रशासनाने गेल्या २० आठवड्यांपासून सलग प्रत्येक शनिवारी शहराच्या वेगवेगळ्या भागात डेंगीमुक्त अभियान राबविले. या काळात नागरिकांमध्ये डेंगी प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यात आली. घराघरात जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी, औषध फवारणी, स्वच्छता उपक्रम तसेच आरोग्य तपासणीचे कार्यक्रम घेण्यात आले. तीन वर्षांपूर्वी शहरात डेंगीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाला होता. एकाच वेळी ९० पेक्षा अधिक रुग्ण आढळून आले होते. मात्र प्रशासकपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर आयुक्त डांगे यांनी शहराच्या आरोग्य व्यवस्थेकडे लक्ष देत डेंगी निर्मूलनाचे नियोजन हाती घेतले. त्यानंतर सुरू केलेल्या 'डेंगीमुक्त अहिल्यानगर' उपक्रमाने उल्लेखनीय यश मिळविले आहे. शहरातील अनेक भागांतील रुग्णसंख्या आता दहाच्या घरात आली आहे. नियमित तपासणी आणि नागरिकांच्या सहभागामुळे डेंगीचा धोका कमी झाला आहे. नागरिकांनी स्वच्छतेकडे लक्ष देऊन प्रशासनाला दिलेली साथ हाच या अभियानाचा खरा पाया ठरला, असे आयुक्त डांगे यांनी सांगितले. अभियानाच्या समारोपावेळी आमदार संग्राम जगताप, आयुक्त यशवंत डांगे, सकाळचे सहयोगी संपादक प्रकाश पाटील यांच्यासह विविध अधिकारी, स्वयंसेवी संस्था आणि विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. या वेळी अभियानात विशेष योगदान देणाऱ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. या उपक्रमातून 'डेंगीमुक्त'च नव्हे, तर 'स्वच्छ आणि सजग अहिल्यानगर' घडविण्याचा संकल्प प्रशासनाने पुढेही कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

शनिवार, दि.१ नोव्हेंबर २०२५ | अहिल्यानगर | पान नं. ८



## हैदराबादहून वैज्ञानिक बलून उड्डाण

### उपकरणे पडण्याची शक्यता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** हैदराबादमधील टाटा मूलभूत संशोधन संस्था तर्फे ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ या कालावधीत वैज्ञानिक बलून उड्डाणे करण्यात येणार आहेत. यासाठी जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे.उड्डाणांची वेळ रात्री ८ ते सकाळी ६.३० आहे. बलूनचा व्यास ५० ते ८५ मीटर असून, ते हायड्रोजन वायूने भरलेले असतील. बलूनमधील उपकरणे ३० ते ४२ किलोमीटर उंचीपर्यंत जाईल आणि पॅराशूटच्या माध्यमातून जमिनीवर उतरतील. वाऱ्याच्या दिशेनुसार उपकरणे २०० ते ३५० किमी अंतरावर पडू शकतात. अहिल्यानगरसह महाराष्ट्रातील औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद, परभणी, सांगली, सातारा, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, जळगाव आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये उपकरणे पडण्याची शक्यता आहे. ज्या ठिकाणी उपकरणे पडतील, ती हलवू, उघडू किंवा छेडछाड करू नयेत. पॅकेजवर दिलेल्या पत्त्यावर त्वरित माहिती द्यावी तसेच जवळच्या पोलीस ठाण्याला व प्रशासनाला कळवावे. उपकरणे सुरक्षित असली तरी त्यातील संवेदनशील वैज्ञानिक साधने असल्याने छेडछाड केल्यास माहिती नष्ट होऊ शकते. संस्था माहिती दिलेल्या नागरिकांना बक्षीस आणि खर्चाची भरपाई देणार आहे. पहिले बलून उड्डाण ऑक्टोबरच्या चौथ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे.

# आत्मनिर्भर भारत निर्मितीत युवकांनी योगदान द्यावे

## जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे; राष्ट्रीय एकता दौड उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** देशाच्या विकासाचा खरा पाया म्हणजे राष्ट्रीय एकता. युवकांनी राष्ट्रनिर्मितीत सक्रीय सहभाग नोंदवून आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीत हातभार लावावा, असा संदेश जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिला. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून शनिवारी आयोजित 'एक भारत, आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय एकता दौड उत्साहात पार पडली.

ही दौड जिल्हाधिकारी कार्यालय, मेरा युवा भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय, जिल्हा पोलीस दल, जिल्हा परिषद कार्यालय व अहिल्यानगर जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाचा शुभारंभ माळीवाडा चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून करण्यात आला. यावेळी महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, उपशिक्षणाधिकारी दरेकर, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, सत्यजीत संतोष आदी मान्यवर उपस्थित होते.



एस.पी. घार्गे म्हणाले, आपला देश विविधतेत एकतेचे प्रतीक आहे. समाजातील सर्व घटक, जाती-धर्म, संस्कृती आणि विचारधारेतील लोक जर एकत्र आले, तर तीच खरी राष्ट्रीय शक्ती ठरते. युवक हे देशाचे भविष्य असून, त्यांनी आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

सकाळी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सुरुवात झालेल्या या दौडीने मार्केटयार्ड चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, वाडिया पार्क, टिळक रोड, नगर-पुणे मार्ग असा मार्गक्रमण केला. पुन्हा माळीवाडा चौकात ही दौड संपन्न झाली.या वेळी विविध शासकीय कार्यालयांतील अधिकारी-कर्मचारी, शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, युवक-युवती, खेळाडू, स्वयंसेवक तसेच सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वांनी भारत माता की जय, वंदे मातरम, एक भारत, मजबूत भारत अशा घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला.

दौडीनंतर युवक-युवतींनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैविध्याचे दर्शन घडविणारी पारंपरिक नृत्ये आणि देशभक्तीपर सादरीकरणे सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या सादरीकरणातून एकतेतच शक्ती आहे हा संदेश अधोरेखित झाला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे व त्यांच्या टीमने, तसेच जिल्हा पोलीस दल आणि मेरा युवा भारतचे स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

## अहिल्यानगर एमआयडीसीमध्ये गुटखा जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील एम.आय.डी.सी. परिसरात अवैध गुटखा व पानमसाला विक्रीवर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. दोन आरोपींकडून एकूण ४,०५,५८५/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून यामध्ये राजश्री पानमसाला, गोवा पानमसाला, विमल पानमसाला आणि वी १, जी १ तंबाखूचा समावेश आहे.

दिनांक ३०ऑक्टोबर रोजी पोलीस अधिकारी किरणकुमार कबाडी यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, बापु कोतकर नावाचा व्यक्ती निंबळक उड्डाणपुलाजवळील रेणुका किरणा स्टोअर्स मध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा बाळगून विक्री करत आहे. यानंतर पोलीस पथकाने तात्काळ



कारवाईसाठी रवाना होऊन आरोपीला ताब्यात घेतले.

कारवाईत, बापु कोतकरच्या दुकानाच्या मागील शेडमध्ये १,९३,५८५/- रुपये किमतीचा गुटखा व तंबाखू जप्त करण्यात आला. दुसऱ्या आरोपी माऊली उर्फ ज्ञानेश्वर गायकवाड यांच्या शेडवर छापा टाकल्यावर २,१२,०००/- रुपये किमतीचा गुटखा व तंबाखू जप्त झाला. परिणामी, एकूण ४,०५,५८५/- रुपये किमतीचा मुद्देमाल पोलीसांनी ताब्यात घेतला.

या प्रकरणी एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ८१५/२०२५ नोंदवण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक श सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई यशस्वी झाली. पथकात पोउपनि अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार विष्णु भागवत, अतुल लोटके, राहुल द्वारके, भिमराज खर्से, भगवान थोरात आणि अर्जुन बडे यांचा समावेश होता.

## पालिका निवडणुकीत विरोधी पक्षाचे नेतृत्व कोण करणार ?

### आ.कर्डिले यांच्या निधनामुळे राहुरीत भाजपाचे कार्यकर्ते सैरभैर!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या अकस्मात मृत्युनंतर राहुरी तालूक्यातील राजकारणात कधीही भरुन न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यामुळे राहुरी तालुक्यातील भाजपचे कार्यकर्ते सैरभैर झाल्याचे दिसून येत आहे. राहुरी नगरपरिषद निवडणुक कशी लढाईची व त्याचे नेतृत्व कोण करणार असा प्रश्न भाजप कार्यकर्त्यांना आता पडला आहे.

स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले हे पूर्वी राहुरी नगरपरिषद निवडणुकीत संपूर्ण ताकद पणाला लावत होते. नऊ वर्षापूर्वी स्व. कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली कर्डिले गट, विखे गट व विकास मंडळाने एकत्रीत निवडणुक लढवीली होती. त्यावेळी कर्डिले, विखे गट व विकास मंडळातील दादा पाटील सोनवणे, शहाजी जाधव,




अक्षय तनपूरे, सोन्याबापू जगधने, विक्रम भूजाडी, सौ. राखी तनपूरे, सौ. नमिता शेटे हे सात नगरसेवक निवडून आले होते. मात्र सध्या विकास मंडळ व कर्डिले गटातील शहाजी जाधव, विजय डौले हे तनपूरे गटात सामील झाले आहेत. तर चाचा तनपूरे यांच्यासह विकास मंडळाने गेल्या विधानसभा निवडणुकीत तनपूरे गटाशी युती केलेली आहे. त्यामुळे कर्डिले व विखे गटाची शहरातील ताकद कमी झाल्याचे दिसून येत आहे. सध्या कर्डिले व विखे गटाकडून माजी नगरसेवक दादा पाटील सोनवणे, अक्षय तनपूरे, विक्रम भूजाडी, अण्णासाहेब शेटे यांच्यासह भैय्यासाहेब शेळके, राजेंद्र उंडे, गणेश खैरे, सचिन मेहेत्रे, अजित डावखर, नारायण धोंगडे, सतिष फुलसौंदर, कांतिलाल जगधने आदी नगरसेवक पदासाठी निवडणुक लढण्याच्या तयारीला लागले आहेत. मात्र शहरात कर्डिले व विखे गटाची ताकद वाढविण्यासाठी कोण नेतृत्व करणार तसेच तनपूरे गटाच्या सत्तेला सुरुंग लावण्यासाठी विरोधकांकडून कोणते डावपेच आखले जाणार हे मात्र अद्याप गुलदस्त्यात आहे. तरी विखे कुटुंब ही निवडणुक हातात घेण्याची चर्चा सुरु आहे. ऐनवेळी विखे गट कुठल्या सोंगट्या टाकणार हे मात्र काळच ठरविणार आहे.

परंतू वरीष्ठ पातळीवर युती व आघाड्यां बाबत कोणताही निर्णय न झाल्याने इच्छुकांमध्ये सध्या तरी संभ्रम आहे. तर या निवडणूकीमध्ये शरद पवार गट, अजित पवार गट, ठाकरे गट, शिंदे गट, आरपीआय तसेच वंचित हे गट निवडणूकीसाठी तयारीला लागल्याचे दिसून येत आहे. तसेच अपक्ष उमेदवारही मोठ्या प्रमाणावर या निवडणूकीत उतरणार असल्याने निवडणुकीत मोठी चुरस निर्माण होणार आहे. सध्यातरी इच्छुक उमेदवारांमध्ये निवडणुकीची हवा शिरली असून त्यांनी मतदारांच्या गाठीभेटीवर भर देऊन उमेदवारीसाठी पक्षश्रेष्ठींकडे शिष्टमंडळ पाठवून मोर्चे बांधणी करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## मुळा शेतकरी सूतगिरणीच्या लिलावाची प्रक्रिया सुरु

### ३६.७६ हेक्टर आर क्षेत्रासह मशिनरीचीही होणार विक्री

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी तालुक्याचे भाग्यविधाते म्हणून ओळखले जाणारे डॉ. बाबुराव तनपुरे यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी उभारलेली शेतकरी सहकारी सूतगिरणी आता अवसायनात निघाल्याने तिच्या लिलावाची प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रशासकांच्या वतीने सुरू झालेल्या या लिलावामुळे पुन्हा एकदा राहुरी तालुक्यात खळबळ उडाली आहे.

या सूतगिरणीचा लिलाव सुमारे ९० एकर जागा आणि प्रेसिंग मशिनरीसह करण्यात येणार असून, एकूण मूल्यांकन किंमत तब्बल २३ कोटीच्या पुढे इतकी रक्कम ठेवण्यात आली आहे. तर प्रेसिंग मशिनरीसाठी स्वतंत्रपणे २३ लाख रुपयांच्या पुढे किंमत निश्चित करण्यात आली आहे.

सदरची लिलाव प्रक्रिया सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, राहुरी येथील अभिरक्षक गोकुळ मोहन नांगरे यांच्या देखरेखीखाली सुरू आहे.यापूर्वी डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखान्याशी संलग्न असलेल्या शिक्षण प्रसारक मंडळाची राहुरी शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेली अंदाजे पाऊन एकराच्या पुढे हि जागा आठ कोटींपेक्षा जादा लिलावात विकली गेली होती. तसेच शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रगती शाळेसमोरील जागेचाही लिलाव झाला होता.

दरम्यान, नुकत्याच झालेल्या डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सभापती अरुण तनपुरे यांच्या नेतृत्वाखालील गटाने एक हाती सत्ता मिळविली आहे. राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत यापूर्वीच जिनिंग-प्रेसिंगची जागा खरेदी करण्यात आली आहे. त्यामुळे आता या सूतगिरणीच्या लिलावात बाजार समिती, कारखाना वा इतर उद्योगपती यात सहभागी होणार का ? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

राहुरी तालुक्यातील जनतेमध्ये एकच चर्चेचा विषय ठरला आहे की राहुरी तालुक्याचे भाग्यविधाते स्व. डॉ. बाबुराव दादा तनपुरे यांनी डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखाना ,मुळा धरण ,महात्मा फुले कृषी विद्यापीठ ,सूतगिरणी, जिनिंग प्रेसिंग यासह आधी छोट्या-मोठ्या सहकारी संस्था उभारणीमध्ये स्वर्गीय डॉ बाबुराव दादा तनपुरे यांचाच सिंहाचा वाटा आहे. राहुरी तालुक्याचा विकास केवळ डॉ. बाबुराव दादा तनपुरे यांच्यामुळे झाल्याचा इतिहास कायम आहे त्यामुळे त्यांच्या सहकाराचा वारसा वाचविला जाणार काय ? की राहुरी चा इतिहासच लिलावात विकला जाणार ? अशी चर्चा सध्या तालुक्यात सुरु आहे.

## मांजाने चिरला तलाठ्याचा गळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** दुचाकीने घरी चाललेल्या तलाठ्याचा नायलॉन मांजाने गळा चिरल्याचा धक्कादायक प्रकार आज दुपारी नालेगाव अमरधामसमोरील परिसरात घडला. राहुल अरुण व्हटकर (रा. सावेडी) असे या कर्मचाऱ्याचे नाव आहे.त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यामुळे पुन्हा नायलॉन मांजाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.व्हटकर दुपारी घरी जाण्यासाठी दुचाकीने निघाले होते. नालेगाव परिसरातील अमरधामसमोर एक पंतग आणि मांजा रस्त्याच्या कडेला अडकला होता. यावेळी त्यांच्या दुचाकीजवळून जाणाऱ्या एका रिक्षाला तो मांजा अडकला. त्यामुळे तो मांजा ओढला जावून व्हटकर यांच्या गळ्यात अचानक अडकला. त्यांच्या गळ्याला मांजाचा फास अडकल्याने व तो ओढला गेल्याने गळा चिरुन मोठा रक्तस्राव झाला.यावेळी त्यांच्यासोबत दुसऱ्या दुचाकीवर असलेले त्यांचे मित्र महसूल कर्मचारी संतोष काळे यांनी तातडीने त्यांना जवळच्या एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

## कर्जमाफीसाठी समिती गठीत

**पुणे :** प्रहारचे अध्यक्ष माजी आमदार बच्चू कडू यांना दिलेल्या आश्वासनानुसार , शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी, त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांबाबत अभ्यासपूर्ण शिफारसी सादर करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत करण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. समिती शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून त्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून सोडवणूक करण्यासाठी तसेच त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अहवाल शासनास सादर करेल. अध्यक्ष - प्रवीण परदेशी (मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मित्रचे मुख्य कार्यकारी अधिकारी), अपर मुख्य सचिव (महसूल) - सदस्य अपर मुख्य सचिव (वित्त) - सदस्य अपर मुख्य सचिव (कृषी) - सदस्यप्रधान सचिव (सहकार व पणन) - सदस्य अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई - सदस्य , अध्यक्ष व कार्यकारी संचालक, बँक ऑफ महाराष्ट्र यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी - सदस्य, संचालक, माहिती व तंत्रज्ञान, सदस्य, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे - सदस्य सचिव.




